दैनिक
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -१७२ | बुधवार दि.२५ फेब्रुवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-172 | Wednesday, Dt.25 February 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# गाडी लावण्याचा शुल्क कारणावरून एजंट राधाकिसन करपेने भर कोर्टात अँड राम डोंगरे यांना कपडे फाटेपर्यंत मारले..!

## पोलीस अधीक्षक साहेब, आरोपी व आलेल्या महिलांचे नाते काय ? त्या महिला आज कोर्टात नेमक्या कशा आल्या?

## घटनेच्या निषेधार्थ आज वकिलांचा न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार..!


जिल्हा न्यायाधीश


जिल्हा पोलीस अधीक्षक


शिवाजी नगर पोलीस स्टेशन

**बीड प्रतिनिधी**

**बीड जिल्हा न्यायालयातील नोटरी वकील अँड राम डोंगरे यांना गाडी लावण्याच्या शुल्लक कारणावरून एजंट राधाकिसन करपे यांनी भर कोर्टात बाहेरील तीन महिला आणि दोन अनोळखी पुरुषांना न्यायालयाच्या कक्षात आणून अँड डोंगरे यांना कपडे फाटेपर्यंत मारहाण केल्याची निषेधार्य घटना मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी अँड राम डोंगरे यांच्या तक्रारीवरून शिवाजीनगर पोलीस स्टेशनला आरोपी राधाकिसन करपे सह इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

पोलीस अधीक्षक साहेब, न्यायालयाच्या आवारात आरोपी सोबत आलेल्या त्या महिलांचे आरोपी सोबत काय नाते आहे ? त्यांचा काही संबंध नसताना त्यांनी वकील डोंगरे यांना का मारहाण केली ? हे तपासात समोर आले पाहिजे. या घटनेच्या निषेधार्थ आज बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार टाकण्यात आला असून प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांना लेखी निवेदन देण्यात आले आहे.

प्राप्त माहितीनुसार, बीड जिल्हा न्यायालयामध्ये मंगळवार दिनांक २४ फेब्रुवारी रोजी सकाळी १०.३० वाजण्याच्या दरम्यान नेहमीप्रमाणे नोटरी वकील अँड राम डोंगरे हे न्यायालयात आले. आपल्या नियमित टेबलवर बसून त्यांनी कामकाज सुरू केले.अवघ्या काही क्षणात त्यांच्या टेबल समोर एजंट राजाकिसन रामचंद्र करपे राहणार शाहूनगर हे आले. त्यांनी आपली मोटरसायकल अँड डोंगरे यांच्या टेबलच्या समोर आडवी लावली. येणाऱ्या पक्षकारांना अडचण होईल आपण आपली मोटरसायकल थोडी बाजूला लावा असे अँड. डोंगरे हे करपे यांना म्हणाले. त्यावर करपे यांनी मी माझी गाडी इथेच लावणार तुला काय करायचे ते कर ? असे उद्धट उत्तर दिले.

त्यावर अँड डोंगरे यांनी वाद न वाढवता करपे थोडे पुढे गेल्यानंतर त्यांनी उभी केलेली गाडी स्वतः जी टेबलच्या आडवी लावली होती ती थोडीशी फक्त बाजूला घेतली. तेवढ्यात करपे पळत आले तू माझ्या गाडीला हात का लावला ? गाडी बाजूला का घेतली ? म्हणून शिवीगाळ करून वाद करू लागले. वाद वाढल्यामुळे आजूबाजूचे वकील मदतीला आले आणि त्यांनी वाद मिटवला. मात्र करपे घटनास्थळावरून जाताना थांब तुला मी आता दाखवतो. आलोच परत असे म्हणून निघून गेले. अवघ्या दहा ते पंधरा मिनिटात ते तीन महिला आणि दोन अनोळखी इसमांना घेऊन थेट कोर्टात आले. आल्याबरोबर त्यांनी अँड.डोंगरे यांना शर्टला धरून टेबल वरून बाजूला घेत शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी देत मारहाण सुरू केली. कहर म्हणजे आलेल्या त्या तीन अनोळखी महिलांनी काहीही संबंध नसताना अँड डोंगरे यांना शिवीगाळ करत भर कोर्टात मारहाण सुरू केली. इतकेच नव्हे तर तू कोर्टात वकिली कशी करतोस ? नोटरी कशी करतोस ? तेच पाहतो म्हणत जीवे मारण्याची धमकी देत मारहाण केली. या घटनेमुळे घटनास्थळी कोर्टात वकील मोठ्या प्रमाणात जमा झाल्यानंतर सर्व आरोपी निघून गेले.

घडलेला प्रकार अतिशय निंदनीय असून भर कोर्टात शुल्लक कारणावरून जर एखाद्या वकिलाला मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिली जात असेल तर बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

तेव्हा पोलीस अधीक्षक साहेब आपण या प्रकरणातील आरोपी विरुद्ध आणि आरोपींनी आणलेले जे भाडोत्री गुंड आणि महिला आणलेल्या होत्या त्यांचा आणि आरोपीचा काय संबंध ? त्या नेमक्या कोण ? याचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

### जिल्हा न्यायाधीश, पोलीस अधीक्षक आणि शिवाजीनगर ठाण्यात वकिलांची एकजुटीने तक्रार..!

अँड राम पांडुरंग डोंगरे नोटरी वकील यांना भर कोर्टात विनाकारण मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देण्याचा निंदनीय प्रकार घडला. या घटनेतील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी बीड जिल्हा वकील संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह सदस्यांनी थेट जिल्हा व सत्र न्यायाधीश तसेच पोलीस अधीक्षक बीड आणि पोलीस निरीक्षक शिवाजीनगर पोलीस ठाणे बीड यांची प्रत्यक्ष भेट घेऊन लेखी तक्रार देत ठाण मांडली. यावर आता पोलीस अधीक्षक आणि जिल्हा व सत्र न्यायाधीश काय भूमिका घेतात याकडे लक्ष वेधले आहे

### आज वकिलांचा न्यायालयीन कामकाजावर बहिष्कार..!!

भर कोर्टात अगदी शुल्क कारणावरून नोटरी वकील अँड राम डोंगरे यांना मारहाण केल्याच्या निषेधार्थ बीड जिल्हा न्यायालयातील सर्व वकिलांनी न्यायालयीन कामकाजावर एकजुटीने आज बुधवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी बहिष्कार टाकला आहे.यामुळे न्यायालयीन कामकाजावर आज मोठा विपरीत परिणाम होणार आहे. त्यामुळे जिल्हा व सत्र न्यायाधीश या घटनेला कशा पद्धतीने न्याय देतात हे पाहणे औसुक्याचे ठरेल.



# मुक्रमाबाद परीसरात अवकाळी पावसाचा कहर

## शेतकऱ्यांचे मोठे नुकसान

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद परीसरात अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण निर्माण होऊन अचानक अवकाळी पावसाने झोडपले आहे. यात शेतकऱ्यांच्या शेतीमालाचे मोठे नुकसान झाले आहे.

मुक्रमाबाद, सावरमाळ, लाखमापूर, इटग्याळ, गोजेगाव,आंदेगाव, सावळी,बैनाळ, खतगाव,परतपुर, रावी, कोटग्याळ,गोनेगाव, मारजवाडी, देगाव,हंगरगासह परिसराला मुसळधार पावसाने झोडपून काढले आहे. २२ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री २ वाजता पावसाला सुरुवात झाली असता एक तास अवकाळी पाऊस विजांच्या

(उर्वरीत पान २ वर)

# रस्त्याच्या कडेला सापडलेल्या अनाथ तरुणाचा उपचाराअभावी मृत्यू





## जिव्हाळा परिवार व शहर पोलिसांची तत्पर धाव, शेवटच्या क्षणीही नातेवाईकांचा आधार नाही

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील भाजी मंडई परिसरात सोमवारी (दि. २३/०२/२०२६) सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास हृदय पिळवटून टाकणारी घटना घडली. अंदाजे ३५ ते ४० वर्षे वयाचा एक अनोळखी तरुण रस्त्याच्या कडेला गंभीर अवस्थेत पडलेला असल्याची माहिती जिव्हाळा परिवाराला फोनद्वारे मिळाली. लवकर या, उपचार मिळाले नाहीत तर तो वाचणार नाही, असा आर्त संदेश मिळताच जिव्हाळा परिवाराचे सदस्य तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.सदर तरुणाची प्रकृती अत्यंत चिंताजनक होती. वेळ न दवडता शहर पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक बल्लाळ साहेब यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांनी तत्परता दाखवत पोलीस हवालदार गर्जे यांना घटनास्थळी पाठवले. उपस्थित नागरिकांच्या मदतीने त्या तरुणाला रिक्षामधून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, रुग्णालयात पोहोचेपर्यंत त्याची प्राणज्योत मालवली होती. डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.**

त्या तरुणाची ओळख पटू शकली नसून त्याचे नाव, गाव किंवा नातेवाईकांची माहिती उपलब्ध नाही. रुग्णालयातील नोंदवहीत जिव्हाळा परिवाराच्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल क्रमांक नोंदवण्यात आला असून मृतदेह पोस्टमार्टम कक्षात ठेवण्यात आला आहे. शहर पोलीस स्टेशनच्या मदतीने त्याच्या

(उर्वरीत पान २ वर)

# बीड शहरातील लाईट सुरळीत ठेवा- गटनेते खुर्शीद आलम

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील अनेक भागात लाईट सुरळीत नसल्याने अंधार पसरलेला दिसुन येत आहे.अनेक भागात लाईट जाण्याचा आणि येण्याचा कोणताही वेळ राहिलेला नाही, महाराष्ट्र विद्युत मंडळाच्या गलथान कारभारामुळे शहरातील नागरिक त्रस्त झाले आहेत.

(उर्वरीत पान २ वर)



## वादळी वाऱ्यासह बीड जिल्ह्यात अतिवृष्टी

बीड ।प्रतिनिधी

रविवारी झालेल्या वादळी वाऱ्यासह पाऊस आणि वेगांच्या कडकडाटासह बीड जिल्ह्यात बऱ्याचशा गावामध्ये शेतकऱ्यांचे ज्वारी,गहू, हरभरा, आंबा तसेच इतर पिके व बागांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ज्वारी गहू मका हे पिके सर्वच्या सर्व भुई सपाट झालेली आहेत. तरी ज्या भागामध्ये खूप मोठे नुकसान झालेले आहे त्या भागामध्ये शासनाने लवकरात लवकर पंचनामा करून, लवकरच शासनाला रिपोर्ट द्यावा. जेणेकरून

(उर्वरीत पान २ वर)




### ज्वारी,गहू आणि आंबा इतर पिकांचे अतोनात नुकसान – गायके राजू

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

# अंधश्रद्धा, व्यसनापासून मुक्त राहून शुद्ध अंत: करणाने निस्वार्थपणे गरिबांची सेवा करने हेच संत गाडगेबाबांना खरे अभिवादन ठरेल - प्रा. डॉ.पांडुरंग सुतार

### इंदिरानगर येथे ०५ व्या मोफत शिकवणी वर्गाचा प्रारंभ करून संत गाडगेबाबांना अभिवादन, महामानव अभिवादन ग्रुपचा उपक्रम

बीड ।प्रतिनिधी

अंधश्रद्धा कर्मकांड व व्यसनापासून मुक्त राहुन शुद्ध अंत:करणाने निस्वार्थपणे गरिबांची सेवा करणे हेच संत गाडगेबाबांना खरे अभिवादन ठरेल असे डॉ.प्रा.पांडुरंग सुतार यांनी इंदिरा नगर कॅनाल रोड बीड येथे महामानव अभिवादन ग्रुप संचलित ०५ व्या मोफत शिकवणी वर्गाचे उद्घाटन प्रसंगी प्रतिपादन केले. इंदिरानगर येथे संत गाडगेबाबांच्या १५० व्या जयंतीचे औचित्य साधून महामानव अभिवादन ग्रुप आयोजित अभिवादन प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सेवानिवृत्त सी.ई.ओ. पि.व्ही. बनसोडे, तर प्रमुख वक्ते म्हणून प्रा.डॉ.पांडुरंग सुतार तर प्रमुख पाहुणे म्हणून संत गाडगेबाबा यांच्या जीवनाचे गाढे अभ्यासक संतोष डोंगरे, प्रा.डा.नामदेव शिनगारे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास प्रा.अशोक गायकवाड, एस. एस. सोनवणे, मुख्याध्यापक वैशाली शिंदे, राजेंद्र ससाने यांची विचार मंचावर उपस्थिती होती. मान्यवरांच्या हस्ते आदर्शांचे पुष्प दीप धुपाने पूजन करून संत गाडगेबाबा यांना पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले यांनी केले तर प्रास्ताविक राजाभाऊ आठवले यांनी केले.राजाभाऊ आठवले यांनी ग्रुप करत असलेल्या विविध उपक्रमाबद्दल सविस्तर माहिती देऊन पुढील नियोजनाबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांशी हितगुज साधताना पालक व विद्यार्थ्यांना आपला उपदेशात सतोष डोंगरे म्हणाले की शिक्षणाचे महत्व क्रांतीसुर्य ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, छत्रपती शाहू महाराज, संत गाडगेबाबा, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेबांनी परिपूर्ण जाणले होते म्हणून त्यांनी सर्व स्तरीय समाजाला शिक्षणाचे महत्व पटवून दिले व आपल्या जीवनात कृती कार्यक्रम निस्वार्थ भावनेने पार पाडले. या सर्व महापुरुषांच्या अतुलनीय कार्यामुळे आपणा सर्वांना हे आजचे दिवस दिसत आहे. तेव्हा आजत जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर लेखणी, वही व पुस्तक हेच खरे शस्त्र समजून स्पर्धेच्या




युगात टिकावयाचे असेल तर आपल्या पाल्यांना मोबाईलच्या आहारी न जाऊ देता, मैदानी खेळच्या व पुस्तकांचा सहवासात राहू द्या. माननीय केळुसकर गुरुजींनी भीमरावांना मॅट्रिक परीक्षा पास झाल्यानंतर स्वलिखित गौतम बुद्धाचे जीवन चरित्र पुस्तक भेट दिले तो प्रसंग सांगून, पुस्तक माणसाचे जीवन कसे बदलू शकते हे बाबासाहेबांच्या जीवनावरून स्पष्ट केले. डॉ.नामदेव शिरगारे अत्यंत सोप्या भाषेत म्हणाले की विद्याथीनी आपल्या पालकांच्या कष्टाची जाणीव ठेवून स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उच्चशिक्षण व अभ्यासातील सातत्य व वाचाल तर वाचाल हा मंत्र लक्षात ठेवून आपले जीवन घडवावे अनेक उदाहरणाद्वारे स्पष्ट केले.

वैशाली शिंदे यांनी मुलांना जयंतीच्या शुभेच्छा दिल्या, अध्यक्षीय समारोपात पी.व्ही.बनसोडे म्हणाले की प्रथमीक स्तरावर मातृभाषेतील शिक्षणामुळे विद्यार्थ्यांची आकलन शक्तीत भरपूर वाड होते. तेव्हा मातृभाषेतील शिक्षणा बरोबरच पुढे इंग्रजी ही जागतिक संपर्काची भाषा असल्यामुळे इंग्रजी भाषेत देखील प्रभुत्व मिळणे कसे गरजेचे आहे हे ०५ व्या वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी महामानव अभिवादन ग्रुप तर्फे ५३ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य (वही पेन ) तर ४० विद्यार्थ्यांना हासुरे इंग्रजी ग्रामर हे पुस्तक मान्यवरांच्या हस्ते वितरित करण्यात आले. मोफत शिकवणी वर्गाच्या विद्यार्थ्यांनी पुरेपूर फायदा घ्यावा व पालकांनी विद्यार्थ्यांच्या प्रगतीकडे लक्ष द्यावे असे समजावून सांगितले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डी.जी.वानखेडे यांनी व्यक्त केले. तर संबोधि प्रतिष्ठान तर्फे विद्यार्थ्यांना आल्पोपहार देण्यात आला. कार्यक्रमास परिसरातील जयश्री साळवे, बेबी साळवे, कौशल्या घाडगे, नानी बोराडे, चंद्रभागा कांबळे बहुसंख्य पालकांची व विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रम यशस्वी करण्याकरता अशोक साळवे, गौतम जावळे, रमेश जावळे व मोफत शिकवणी वर्गाच्या शिक्षिका शितल जावळे यांनी बहुमोल परिश्रम घेतले.

### शासनाने वेतन त्रुटी तात्काळ दूर करून योग्य वेतनश्रेणी लागू करावी या मागणीसाठी

# लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांचा बीड जिल्ह्यात भव्य एल्गार, कामकाज ठप्प

बीड ।प्रतिनिधी

राज्य सरकारने लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांची वेतन त्रुटी तात्काळ दूर करून योग्य वेतनश्रेणी लागू करावी या प्रमुख मागणी सह विविध मागण्या संदर्भात राज्यभरामध्ये लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा एल्गार पुकारला आहे. बीड जिल्ह्यातील लिपिक कर्मचाऱ्यांनी या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतल्यामुळे कामकाज ठप्प झाले आहे. अशीच परिस्थिती राज्यभरात निर्माण झाली असून जर सरकारने यावर लवकर मार्ग काढला नाही तर प्रशासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शासकीय, निमशासकीय अधिकारी व कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांनी विविध मागण्या संदर्भात लोकशाही पद्धतीने आंदोलन सुरू केले आहे.वेतन त्रुटी तात्काळ दूर करून योग्य वेतनश्रेणी लागू करावी या प्रमुख मागणीसह पदोन्नती प्रक्रियेला गती देऊन वरिष्ठतेनुसार न्याय द्यावा, रिक्त पदे तातडीने भरून कामाचा ताण कमी करावा, समान कामासाठी समान वेतनाची अंमलबजावणी करावी, सेवा अटी व नियमांमध्ये सुधारणा करून कर्मचाऱ्यांना दिलासा द्यावा, जुने प्रलंबित भत्ते व देयके तातडीने




अदा करावेत या मागणीसाठी २४ फेब्रुवारी रोजी बीड जिल्हा परिषदेसमोर भव्य धरणे आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन १६ फेब्रुवारीपासून टप्प्याटप्प्याने सुरू झालेले आहे.तरी देखील राज्य शासनाने अद्याप दखल न घेतल्यामुळे लिपिक कर्मचारी वर्गातून सरकारच्या विरोधात तीव्र नाराजीचा सूर उमटत आहे.

या आंदोलनामध्ये राज्याध्यक्ष अशोक डहाळे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये पदाधिकारी, कर्मचारी व सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झालेले आहेत. जिल्हा परिषद नंतर या सर्व कर्मचाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन सुरू केले आहे.

या आंदोलनामध्ये राज्य महिला संपर्कप्रमुख श्रीमती जनाबाई गोसावी, जिल्हा पालक अध्यक्ष श्रीरंग धनवे, जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर आगळे,जिल्हा कार्याध्यक्ष महादेव सोनवलकर,खजिनदार खंडोजी गोरे, सचिव दीपक जाधव,महिला जिल्हाध्यक्ष स्वाती बामणे,जिल्हा महिला उपाध्यक्ष छाया घोसे,सुरेखा विभुते, तसेच ज्ञानेश्वर कुलकर्णी, माधव नायगावकर, अविनाश लहुरीकर,बाळासाहेब केकान, राहुल देशमुख, हेमंत कवठेकर, सुमंत आखाडे, निळकंठ दराडे, पंकज हिंगे, गोविंद कोकणे, महेंद्र आनेराव,भुजंगे दिलीप, सिद्धेश्वर वखरे,राठोड शिवाजी यासह जिल्ह्यातील लिपिक, कर्मचारी वर्ग या आंदोलनामध्ये मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत. या सर्व कर्मचाऱ्यांनी राज्यस्तरावर ठोस निर्णय होईपर्यंत प्रशासकीय कामकाजामध्ये असहकार आंदोलन पुकारण्याचा इशारा दिला आहे. त्याचबरोबर अतिरिक्त कामांना नकार देणे, कामकाजावर मर्यादा आणू नये अशा पद्धतीने टप्प्याटप्प्याने आंदोलनाची तीव्रता वाढवली जाणार असल्याचे स्पष्ट केले आहे. लिपिक कर्मचारी यांच्या या भूमिकेमुळे प्रशासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून अधिकारी कर्मचाऱ्यांच्या पगारी सुद्धा वेळेवर होणार नाहीत आणि सामान्य जनतेची कामे सुद्धा ठप्प होतील अशी शक्यता व्यक्त होत आहे.

आंदोलनाचा ठाम पवित्रा..

हे आंदोलन केवळ एका दिवसापूर्वी मर्यादित न ठेवता जोपर्यंत राज्य नेतृत्वाकडून आंदोलन मागे घेण्याची निर्देश येणार नाहीत तोपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्णय लिपिक कर्मचारी यांनी घेतला आहे. त्यामुळे शासनाने जर धोरणात्मक ठोस निर्णय घेतला नाही तर आंदोलन राज्यभरात अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.या आंदोलनामुळे शासकीय करण्याच्या कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असून नागरिकांच्या दैनंदिन कामावर देखील याचा परिणाम होऊ शकतो. राज्यातील लिपिक वर्गीय कर्मचाऱ्यांचा हा लढा आता निर्णय टप्प्यावर पोहोचल्यामुळे शासन यावर काय भूमिका घेते याकडे राज्याचे लक्ष वेधले आहे.

## संपादकीय....

# मुलांना तणावमुक्त ठेवा

मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या अशा बारावी-दहावी परीक्षा राज्यात सुरू झाल्या आहेत. या परीक्षेच्या कार्यकाळात मुलं अभ्यासाच्या तणावातून जात असतात. तेव्हा पालकांनी मुलांच्या आरोग्याकडे बारकाईने लक्ष द्यावयास हवे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत १०९ गैरप्रकार झाले असून कोकण विभागीय मंडळामध्ये एकही गैरप्रकार झालेला नाही. तेव्हा परीक्षा मंडळाने अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल. त्यासाठी पालकांनी परीक्षेच्या कार्यकाळात परीक्षा सुरू असताना मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

परीक्षेचे वेळापत्रक जसजसे जवळ येते तसतसे मुलांचा ताण वाढण्याला मदत होत असते. जी मुले नियमित अभ्यास करतात त्यांना कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. तेव्हा आई-वडिलांनी मुलांची केवळ परीक्षेपुरती काळजी न घेता नियमितपणे काळजी घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा परीक्षा जवळ आली की मुलांची डोकेदुखी, पोटदुखी, अंगदुखी, झोप न येणे, मूल चिडचिडे होणे असे दिसून येते. अशा वेळी पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन सकारात्मक दृष्टिकोन मुलांबरोबर ठेवावा. याचा परिणाम म्हणून त्यांना प्रोत्साहन मिळून ती अधिक जोमाने अभ्यास करून तणावमुक्त होऊन परीक्षेला आनंदाने सामोरे जातील. पालकांनी आपली मुले परीक्षेत यशवंत होण्यासाठी परीक्षेच्या कालावधीत मुलांच्या मनात तणाव वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तेव्हा मुलांच्या अभ्यासातील प्रगतीचा भूतकाळ कसा होता किंवा त्यांनी काय केले याची उजळणी न करता त्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याशी सुसंवाद साधावा. मुलांच्या परीक्षेविषयी त्यांच्या मनातील भीती दूर करावी. त्यांना आनंदित ठेवावे. पालकांनी अभ्यासासाठी जास्त सक्ती करू नये. मुलांनासुद्धा आपल्या परीने अभ्यास करू द्यावा. तेव्हा आपल्यावरती आता धाक नाही असे मुलांनी न समजता अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. यात आपलेच नुकसान होणार आहे, याची मुलांनी दक्षता घ्यावी. यासाठी मुलांनी आज्ञाधारक राहिले पाहिजे.

महत्त्वाची बाब म्हणजे, आपले मूल परीक्षेच्या काळात पुरेसे जेवण करीत आहे का? याकडे सुद्धा पालकांनी लक्ष द्यायला हवे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. त्यासाठी त्यांना संतुलित आहार नियमित मिळणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांची ऊर्जा टिकून राहते. परीक्षा काळात मुलांच्या जेवणात बदल करू नये. तसेच त्यांना पुरेशी झोप घेण्यास सहकार्य करावे. मुलांना पुरेशी झोप मिळाल्यामुळे ते अधिक एकाग्रतेने अभ्यास करू शकतात. त्यात टीव्ही पाहणे आणि आरोग्यासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा असतो. काही पालक रात्रभर अभ्यास करा असे मुलांना सांगत असतात किंवा अभ्यासिकेत पाठविले जाते. अशा वेळी पालकांनी सुद्धा मुलांचा कल लक्षात घेणे गरजेचे असते. कारण इतरांपेक्षा आपल्या मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहिती असतात. अभ्यासाबरोबर आरामाचीसुद्धा मुलांना नितांत आवश्यकता असते. याकडे सुद्धा पालकांनी अधिक लक्ष द्यायला हवे. याचा जास्त फायदा आपल्या मुलांना होत असतो. याची कल्पना पालकांना असायला हवी. अभ्यासाबरोबर घराचीसुद्धा स्वच्छता जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर पालकांनी स्वत: शांत राहणे महत्त्वाचे असते. परीक्षा काय दररोज होत नाहीत. मात्र परीक्षेचा काळ मुलांप्रमाणे पालकांसाठीही महत्त्वाचा असतो. या कार्यकाळात मुलांना तणावमुक्त होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते, मात्र यात जास्त वेळ घालवू नये. मुलांच्या अभ्यासासाठी कशी मदत होईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. यात जास्त वेळ घालवू नये. परीक्षेच्या काळात मुलांचा ताण वाढल्यास मुलांनी त्याचा सामना कसा करावा याचा योग्य सल्ला घ्यावा. या काळात मुलांना अभ्यास करताना व्यत्यय येणार नाही याची पालकांनी काळजी घ्यावी. आरामात अभ्यास करेल अशा जागेत त्याला अभ्यास करण्यासाठी बसवावे.

पान १ वरून...

**रस्त्याच्या कडेला....**

नातेवाईकांचा शोध सुरू आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणाला कॅन्सरचा आजार होता. तोंडातील जीभ काढण्यात आल्याने त्याला बोलता येत नव्हते. तो भाजी मंडई परिसरात बिगारी काम करून उदरनिर्वाह करत होता. काही दिवसांपूर्वी तो 'जिव्हाळा केंद्रात' आश्रयास होता. प्रकृती खालावल्याने त्याला शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. उपचारानंतर तो स्वतः घरी जाण्याची इच्छा व्यक्त करून गेला होता.

असे असतानाही शेवटच्या क्षणी त्याला रक्ताच्या नात्यांपैकी कुणाचाही आधार मिळाला नाही, ही अत्यंत वेदनादायक बाब आहे. व्यसनाधीनतेमुळे कुटुंबीय दुरावल्याची चर्चा परिसरात होती. व्यसन माणसाला केवळ शारीरिकच नव्हे तर सामाजिकदृष्ट्याही एकाकी करते, याचे हे जिवंत उदाहरण असल्याची भावना व्यक्त होत आहे.घटनेदरम्यान अनेकांनी केवळ चर्चा करत मदत न करता जबाबदारी इतरांवर ढकलल्याचे चित्रही पाहायला मिळाले. मात्र, जिव्हाळा परिवार व पोलिसांनी दाखवलेली मानवतेची भूमिका समाजासाठी प्रेरणादायी ठरली आहे.सदर अनोळखी व्यक्तीस जिव्हाळा परिवाराकडून भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली असून, त्याच्या नातेवाईकांचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.मानवतेचा हात पुढे करणाऱ्यांमुळेच समाजात माणुसकी जिवंत आहे, हे या घटनेतून पुन्हा अधोरेखित झाले.

**वादळी वाऱ्यासह ....**

वेळेत शेतकऱ्यांना मदत मिळेल असे आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू गायके यांनी केले आहे.

बीड तालुक्यातील पारगाव शिरस, नवगण राजुरी, पेंडगाव आदी महसूल मंडळात खापर पांगरी, सौंदाना, दगडी साजनपूर, उमरद जहागीर, पारगाव शिरस, शहाजनपूर, कुमसी, कांबी, पेंडगाव, कामखेडा, आहेर चिंचोली, या गावामध्ये खूप मोठ्या प्रमाणामध्ये शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे. तरी याची दखल घेऊन वेळीच कार्यवाही करण्यात यावी जेणेकरून याचा मोबदला लवकरात लवकर शेतकऱ्यांना मिळेल आणि यामधून शेतकऱ्यांना दिलासा मिळेल. फुल ना फुलाची पाकळी मिळेल जेणेकरून शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची नोंद सरकार दरबारी घ्यावी असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजू गायके यांनी कळवले आहे.

**मुक्रमाबाद परीसरात ....**

कडकडाटात पाऊस पडला आणि २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता मुसळधार पावसाने झोडपले आहे.त्यामुळे शेतकऱ्यांचा मोठा नुकसान झाले आहे.हरभरा, ज्वारी, गहू, भोईमुग, चिंच, पंपई, टरबूज, खरबूज, कलिंगड, करडी, आंबा, जाब, तिंकीसह अनेक पिकांचे नुकसान झाले आहे. वादळीवाऱ्यामुळे कापनि करून ठेवलेली तुर पिके भोई सपाट झाली आहे. अचानक वादळीवाऱ्यामुळे अनेक पिके आडवी पडली आहे. खरीप हंगामात शेतकऱ्यांच्या जमिनी खरडून गेली होती. तोंडाशी आलेला पिके पाण्याखाली

पान १ वरून...

गेले होते. गतवर्षी २०२५मध्ये जुलै व ऑगस्टमध्ये मोठ्या प्रमाणात खरीप पिकांचे प्रचंड मोठे नुकसान झाले होते. मराठवाड्यात तर पिकांचे फार मोठे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्र्यांनी ऑक्टोंबर मध्ये शेतकऱ्यांना पिकं विमा मदत जाहीर केली होती. गेल्या सहा महिन्यापासून शेतकऱ्यांनी भरलेल्या मंजूर झालेल्या पिक विमा मिळत नसल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांचे खरपी ही गेला असताना कसेबसे शेतकरी सावरण्याचा प्रयत्न करीत असताना अचानक रब्बी हंगामा ही गेला असल्याने शेतकरी राजा मोठा कोटीत अडकलेला आहे. आता तोंडाशी आलेले खरीप रब्बी हंगामा वाया गेल्याने शेतकऱ्यांना पुढे पेरणी कशी करावी ही चिंता लागली आहे. ऑक्टोंबर मध्ये जाहीर केलेले पिक विमा पैसे शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार अशी घोषणा सरकारने केली आहे. तरीही सहा महिन्यापासून शेतकऱ्यांचे पिक विम्याचे पैसे शासनाने जमा केले नसल्यामुळे शेतकरी अडचणीत अडकला आहे. १७ ऑगस्ट २०२५ रोजी मुसळधार पावसाने आहाकार माजला होता दीड महिने अक्षरशा मुसळधार पावसाने अनेक पिके जमीन उध्वस्त होऊन नगदी पिके म्हणून मूग उडीद सोयाबीन पिकांना मोड फुटले तर काही शेतकऱ्यांची पिके खरडून गेली अतिवृष्टीमुळे अनेक पिके शेती शिवारा शिल्लक नव्हती तरीही शेतकरी कसेतरी शेकरी सावरण्याचे प्रयत्न करीत असताना अचानक रब्बी हंगामाही गेला आहे.

**बीड शहरातील....**

सनासुधीच्या वेळेस सुद्धा लाईट सुरळीत मिळत नाही. त्यामुळे बीड शहरातील लाईट सुरळीत करण्यात यावी अशी मागणी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने गटनेते खुर्शीद आलम यांनी केली आहे. बीड शहरातील अनेक डि.पी. चे किटकॅट फुटुन तुकडे तुकडे झालेले आहेत. तर अनेक ठिकाणी कुजलेले खंबे असुन ते तुटून पडले तर मोठ्ठी जिवितहानी होण्याची शक्यता आहे. तर अनेक ठिकाणी विद्युत तार लोंबकळत आहे.त्यामुळे सुद्धा जिवितहानी होण्याची शक्यता आहे. तर अनेक ठिकाणी विद्युत खंबे नसल्यामुळे लोकांना पाच पाचशे फुटांवरून विद्युत मिटर घ्यावे लागत आहेत. लोकसंख्या अनुसार डि.पी.नसल्याने व्होल्टेज कमी जास्त होऊन इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक वस्तू जळुन जाते. अनेक वर्षांपासून ची विद्युत तारे कधी तुटून अंगावर पडेल याचा नेम नाही अश्या विविध तक्रारी घेऊन आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गटाचे गटनेते खुर्शीद आलम यांच्या नेतृत्वात नगरसेवकांच्या शिष्टमंडळाने म.वि.वि.कं. चे मुख्य अभियंता साहेब यांची भेट घेतली. म.वि.वि.चे मुख्य अभियंता यांनी वरील समस्या संदर्भात विशेष लक्ष देऊन कामे मार्गी लागेल असे आश्वासन दिले आहे. यावेळी गटनेते नगरसेवक खुर्शीद आलम, नगरसेवक भारत कांबळे, नगरसेवक अथहर भाई, नगरसेवक जाधव साहेब, नगरसेवक अय्युब खान, नगरसेवक शेख अफसर, नगरसेवक मसुद खान, नगरसेवक रईस भाई, नगरसेवक मसी मोमीन, नगरसेवक उल्हास ग्राम, नगरसेवक पिंगळे साहेब, नगरसेवक काळे साहेब आ.संदिप भैय्या क्षीरसागर यांचे पी.ए. चौरे साहेब उपस्थित होते.

# डॉ. श्रीनिवास कोलोड वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्काराने सन्मानित



धर्माबाद अशोक पडोळे

तालुक्यातील मौजे मंगनाळी येथील रहिवासी तथा प्रादेशिक मनोरुग्णालय येरवडा पुणे येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. श्रीनिवास रामचंद्र कोलोड यांनी आरोग्य विभागात केलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल वंदनीय बाळासाहेब ठाकरे आरोग्यरत्न पुरस्कार व महाआरोग्य सन्मान २०२६ च्या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. आरोग्यसेवा आयुक्तालय मुंबईच्या अतिरिक्त संचालक डॉ. सुनिता गोल्हाईत यांच्या वतीने देण्यात आले होते. त्या अनुषंगाने रविवार दिनांक २२ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी यशवंतराव चव्हाण सभागृह नरिमन पॉईंट मुंबई येथे महाराष्ट्र शासनाचा सदरील पुरस्कार आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला आहे.

यावेळी सचिव इ. रविंद्रन, आरोग्य सेवा आयुक्त डॉ. कादंबरी बलकवडे, संचालक डॉ. विजय कंदेवाड, डॉ. नितीन आंबाडेकर, अतिरिक्त संचालक डॉ. सुनीता गोल्हाईत इत्यादी मान्यवर उपस्थित होते.डॉ. श्रीनिवास कोलोड यांनी केलेल्या आंतररुग्ण सेवा, बाह्य रुग्ण सेवा तसेच महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत दिलेले उपचार व मनोरुग्णांचे केलेले पुनर्वसन याची दखल घेऊन महाराष्ट्र शासनाच्या वतीने सदरील पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.त्यांना या मिळालेल्या पुरस्काराबद्दल आरोग्य विभागातील त्यांचे वरिष्ठ अधिकारी, मित्रमंडळी व मंगनाळी येथील समस्त नागरिक यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत.

# मत्स्योदरी विधी महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरात लोक अदालत व वाद निवारण उपक्रम गावपातळीवर न्यायजागर




जालना ।प्रतिनिधी

मत्स्योदरी विधी महाविद्यालय, जालना यांच्या विधी सहाय्य केंद्राच्या वतीने राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रमसंस्कार शिबिरांतर्गत राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या जयंतीनिमित्त लोक अदालत व तडजोडीने वाद निवारण या महत्वपूर्ण उपक्रमाचे आयोजन तांदुळवाडी येथे करण्यात आले.जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,जालना यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमामुळे ग्रामीण भागात न्यायाबाबत जनजागृती निर्माण झाली.

कार्यक्रमाचे उद्घाटन व मार्गदर्शन मा.नितेश बंडगर, सचिव,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जालना यांनी केले. यावेळी त्यांनी लोक अदालत ही गरीब व सामान्य नागरिकांसाठी जलद सुलभ व खर्चविरहित न्याय मिळवण्याची प्रभावी व्यवस्था असल्याचे प्रतिपादन केले.मुख्य लोक अभिरक्षक मा. ड.महेश वाघुंडे यांनी प्राचीन काळातील गावपातळीवरील पंचनिवाडा प्रणालीचा उल्लेख करत त्याच संकल्पनेचे आधुनिक रूप म्हणजे लोक अदालत असल्याचे सांगितले. बांधावरून होणारे छोटे-मोठे वाद गाव पातळीवरच सामंजस्याने सोडवून सामाजिक सलोखा टिकवण्याचे आवाहन त्यांनी केले.

सहाय्यक लोक अभिरक्षक मा. ड.मौजूद शेख यांनी कायदा शिक्षणाचे महत्व अधोरेखित करत कायद्याचे ज्ञान हीच खरी शक्ती आहे असे प्रतिपादन केले.जि.प.प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका कुलकर्णी एस. बी.यांनी या उपक्रमामुळे न्यायव्यवस्थेबाबत लोकांच्या मनात पुन्हा विश्वास निर्माण होईल असा आशावाद व्यक्त केला.


कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शेख टी.वाय.यांनी प्रास्ताविक करताना लोक अदालत हा असा मंच आहे जिथे कोणाचाही पराभव होत नाही तर केवळ न्याय मिळतो असे सांगून ही पर्यायी न्यायव्यवस्था घराघरात पोहोचवण्याचे आवाहन केले.यावेळी मा.आनंद भिसे सरपंच व मा.गणेश भिसे अध्यक्ष, तंटामुक्त समिती यांनीही आपले मनोगत व्यक्त करून तंटामुक्त गाव संकल्पनेला बळ देण्याचे आवाहन केले.बाल विवाह विरोधात प्रभावी पथनाट्य महाविद्यालयाच्या विधी सहाय्य केंद्राच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या बाल विवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत विद्यार्थ्यांनी वय खेळण्याचं शिक्षा आयुष्यभराची या विषयावर प्रभावी पथनाट्य सादर करून उपस्थितांमध्ये जनजागृती केली.या सामाजिक संदेशाने उपस्थितांवर मोठा प्रभाव पडला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हंगरगे एस.डी.यांनी केले तर आभार प्रा.देशमुख एस.व्ही. यांनी मानले.यावेळी प्रा.गोरे एस.जे.,प्रा. पवार आर.पी.,प्रा.जोशी व्ही. एस.,प्रा.शेख एच.एम.,कोकने सी.यू.तसेच ग्रामस्थ, विद्यार्थी-विद्यार्थिनी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौसाळा येथील हजरत सैलानी बाबा संदलच्या अध्यक्षपदी प्रथमेश वाघमारे तर सचिवपदी प्रशांत सोनवणे

बीड ।प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी बीड तालुक्यातील चौसाळा येथील हिंदु मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेल्या हजरत सैलानी बाबा संदल निमित्त शासकीय विश्रामगृह चौसाळा येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.याबैठकीमध्ये सर्वानुमते अध्यक्षपदी प्रथमेश वाघमारे तर उपाध्यक्षपदी अमोल सोनवणे व सचिवपदी प्रशांत सोनवणे तर खजिनदार म्हणून अंकुश(तात्या )सोनवणे यांची निवड करण्यात आली.

या बैठकीस बापू पवार,ग्रामपंचायत सदस्य सुरज सोनवणे,ग्रामपंचायत सदस्य आमोल कांबळे,विशाल सोनवणे, शैलेश सोमीनाथ सोनवणे, आकाश सोनवणे, रवी सोनवणे, दादू गायकवाड, धर्मा सोनवणे, प्रेम गायके, विशाल काळे, साहील सोनवणे इत्यादी उपस्थित होते तर प्रसिध्दी प्रमुख म्हणून चौसाळा पत्रकार संघाचे अध्यक्ष विवेक कुचेकर, पत्रकार पंडित जोगदंड, पत्रकार मिराज मुलानी, पत्रकार बळीराम राऊत,पत्रकार ख्वाजाभाई जहागिरदार यांची निवड करण्यात आली.



# प्रा.सुदर्शन स्वामी यांना पीएच.डी पदवी प्रदान

माजलगाव ।प्रतिनिधी

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयातील इतिहास विषयाचे प्रा. सुदर्शन उद्धवराव स्वामी यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठा अंतर्गत इतिहास विषयामध्ये पीएच.डी प्रदान करण्यात आली आहे. प्रा.सुदर्शन उद्धवराव स्वामी यांनी प्राचार्य डॉ. गौतम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील अस्पृश्यांचे धर्मांतर : एक ऐतिहासिक अभ्यास (इ.स. १९४७ - २००७) या विषयावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शोध प्रबंध सादर केला होता.प्रा. सुदर्शन स्वामी यांच्या यशाबद्दल म.शि. प्र.मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाश सोळंके,सरचिटणीस आ.सतीश चव्हाण, यांच्यासह महाविद्यालय विकास समिती सदस्य ऍड.बी.आर.डक, सत्यप्रकाश रुद्रवार, डॉ. बी. एल. चव्हाण, प्राचार्य डॉ. जी.के. सानप, प्र.प्राचार्य डॉ. एन. के. मुळे,उपप्राचार्य डॉ.एम.ए.कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवन शिंदे डॉ.बालाजी बोडके, डॉ. अरुण पेंटावार, डॉ.शंकर इप्पर, डॉ. सचिन रुद्रवार, डॉ भाऊसाहेब राठोड, डॉ.डी.एस. शिंदे, डॉ. बिलास काळे, डॉ. के. बी. गंगणे,डॉ गणेश मोकासरे,डॉ. सतीश डाके, डॉ.भाऊसाहेब राठोड,प्रा.एस. एस. कदम,प्रा संजय बागुल, एकनाथ मस्के यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.



**तहसील कार्यालय,बीड**
**(संकीर्ण विभाग)**

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार यांचे न्यायालयात सुनावणी नोटीस**
**क्र.२०२५/संकीर्ण/जन्म-मृत्यू-नोंद-कावी-/९/ दि.१३.०२.२०२६**

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार आसाराम पि.कारभारी कुर्लेकर, रा.वंजारवाडी ता.जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांचे आजोबा **पंडु भवानी कुर्लेकर** यांचा मृत्यू दि.१४.०४.१९८६ रोजी गेवराई येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, वंजारवाडी, ता.जि.बीड येथे नोंद घेणे राहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयमाचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, वंजारवाडी, ता.जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता मृत्यूबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तहसीलदार, बीड**

# पैशांच्या वादातून चुलत्याचा खून करणाऱ्या पुतण्यास जन्मठेप

## अंबाजोगाई न्यायालयाने ठोठावली शिक्षा

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने सख्या चुलत्याची हत्या करणाऱ्या अर्जुन दत्तात्रय धोंगडे या पुतण्यास सश्रम जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. खर्चासाठी पैसे दिले नाहीत या रागातून आरोपीने अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर येथे जनार्दन धोंगडे यांच्यावर कत्तीने वार करून त्यांची हत्या केली होती. या प्रकरणात मयताची मुलगी वैशाली वाघमारे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला होता. सुनावणी दरम्यान आरोपीने स्वतःला मानसिक रुग्ण असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला, मात्र सरकारी वकील ऍड.लक्ष्मण फड यांनी भक्कम पुराव्यांच्या आधारे तो दावा खोडून काढला. न्यायाधीश अजितकुमार भस्मे यांनी सात साक्षीदारांच्या साक्षी आणि प्रत्यक्षदर्शींचा पुरावा ग्राह्य धरून आरोपीला जन्मठेप व पाच हजार रुपये दंड ठोठावला आहे.



**।। जाहीर प्रगटन ।।**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, श्री. प्रशांत प्रतापराव पाटील, रा. कुर्ला ता.जि.बीड यांचे मालकी व ताब्यातील मौजे कुर्ला ता. जि.बीड येथील गट नंबर २९२ मधील ०१ हे. ८२ आर जमीनीपैकी ०१ हे. २० आर जमीन जिची चतुःसिमा, पुर्वेस: बिंदुसरा नदी, पश्चिमेस : कुर्ला-एरंडगाव सार्वजनिक रस्ता, दक्षिणेस भिमराव आबुज, गंधारी घोडके व रामप्रसाद गुंड यांची जमीन, उत्तरेस :- प्रशांत पाटील यांची उर्वरीत जमीन (मुळ मालक)

ही मिळकत आमचे पक्षकार श्री. संतोष सखाराम मस्के, वय-५३वर्षे व्यवसाय शेती, रा. पालवन, ता.जि.बीड यांचेमध्ये खरेदी विक्रीचा व्यवहार झालेला आहे व त्यांच्यामध्ये नाटरी ईसार पावती झालेली आहे. सदर जमीनी बाबत श्री. प्रशांत प्रतापराव पाटील यांचे शिवाय इतर कोणाचे काही हक्क संबंध, तक्रार, आक्षेप, खरेदीखत व्यवहार, चोळी बांगडी, हिबानामा, गहाणखत, बक्षीसपत्र, भाडेपत्र, ईसार पावती व मुखत्यारपत्र अथवा उजरदारी असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन आठ दिवसाच्या आत त्यांच्या हक्का बाबत असलेल्या कागदपत्रासह त्यांचे म्हणने खालील पत्त्यावर लेखी कळवावे अन्यथा उपरोक्त व्यवहारा बाबत कोणाचाही कुठल्या प्रकारचा कोणताही आक्षेप नाही असे समजण्यात येईल व आमचे पक्षकार सदर जमीनीचे कायमचे खरेदीखताचा व्यवहार करण्यास मुक्त राहतील. सदर मुदती नंतर कोणाचे काही हक्क संबंध व तक्रारी ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

सबब हे जाहीर प्रगटन.
बीड
तारीख :- २५/०२/२

**मार्फत**
**ॲड. श्री. एस.बी.आंधळे,**
जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
मो.नं. ९४०४०१०७०८

**जाहीर प्रगटन देणार**
**संतोष मस्के**
**श्री. संतोष सखाराम मस्के**
**रा. पालवन,**
**ता.जि.बीड - ४३११२२**
**मो.नं. ९९२११०७३२५**

**तहसील कार्यालय, गेवराई ता.गेवराई जि.बीड**
**(दंड विभाग)**

## जाहिर प्रगटन

याव्दारे जाहिर प्रगटन देण्यात येते की प्रकरणात **अर्जदार दौलत नारायण चौधरी रा.तपे निमगांव ता.गेवराई जि.बीड** यांनी असा अर्ज केला आहे की, त्यांची **आई लक्ष्मी नारायण चौधरी** यांचा **मृत्यू दि.१९.०५.१९९५** रोजी गेवराई येथे राहत्या घरी झालेला आहे तसेच **अर्जदाराकडुन अनावधानाने ग्रामपंचायत कार्यालय, तपे निमगांव ता.गेवराई जि.बीड येथे नोंद घेणे राहुन गेलेले** आहे. अर्जदारास शासकीय मृत्यू नोंदीचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करिता अर्जदाराचा अर्ज मंजुर करुन सदरील मयमाचे नांव नोंद घेणे बाबत **ग्रामपंचायत कार्यालय, तपे निमगांव, ता.गेवराई जि.बीड** यांना आदेशीत करणे बाबत विनंती केली आहे.

करिता मृत्यूबाबत कोणाची काहीही हरकत असल्यास आपले हरकती अथवा आक्षेप १५ दिवसांचे आत सादर करावेत. त्यानंतर प्राप्त होणा-या हरकती अथवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**स्वाक्षरित/-**
**तालूका दंडाधिकारी गेवराई**

**जाहीर प्रगटन**
**ॲड.ए.एस.गरूड**
श्रीमती वंदना व्ही जोशी दिवाणी न्यायाधीश व स्तर बीड यांचे न्यायालयात
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १८६८/२०२५**
**संभाजी पि.मधुकर लोंढे व इतर वि.निरंक**

अर्जदार **१. संभाजी पि.मधुकर लोंढे, वय-३९ वर्षे, धंदा-नौकरी, रा.कोळगांव ता.गेवराई जि.बीड, २. सिमा भ्र.बप्पासाहेब शेळके वय-४२ वर्षे, धंदा-घरकाम, रा.पुरूषोत्तमपुरी ता.माजलगांव जि.बीड, ३. सुलभा संदिपान पवार वय-४१ वर्षे, धंदा-घरकाम, रा.कोळी सिरसगांव ता.अंबड जि.जालना, ४. वर्षा भ्र. गणेश घोरपडे, वय-४० वर्षे, धंदा-घरकाम, रा.शिंगवे, ता.साकारवाडी ता.राहता जि.अहमदनगर**

सर्व जनतेस या जाहीर प्रगटन नोटीसव्दारे कळविण्यात येते की, या न्यायालयामध्ये वरील अर्जदार क. १ ते ४ हे मयत नामे नंदाबाई मधुकर लोंढे यांचे मुले व मुली आहेत. अर्जदारांचे वडील व मयताचे पती नामे मधुकर लोंढे हे यापुर्वीच मयत झालेले आहेत.असे की मयत नामे नंदाबाई मधुकर लोंढे यांचा दिनांक १५/०२/२०२५ रोजी कासलीवाल मारवेल वेस्ट, छत्रपती संभाजीनगर, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहेत. त्याचे वारस असल्या बाबत दिवाणी न्यायालय क.. स्तर, गेवराई या न्यायालयात दिवाणी किरकोळ अर्ज क. ५०९/२०२५, संभाजी मधुकर लोंढे वि. निरंक हा अर्ज दिनांक १५/०९/२०२५ रोजी निकाली काढण्यात आला. त्यानंतर उपरोक्त अर्जदाराने मा. दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड येथे कलम ३७२ भारतीय वारसा हक्क कायदा नुसार वारस असल्याचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज केला आहे. मयाताचे पश्चात सदर वरील अर्जदार हे कायदेशीर वारस असुन त्यांचे व्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही.

| अ.क्र. | मयत खातेदारांचे नाव व पत्ता | मयत खातेदाराच्या नावे शिल्लक रक्कम | मयत खातेदाराचा खाते नंबर व बँकेचे नाव |
|---|---|---|---|
| १ | नंदाबाई मधुकर लोंढे | रू.८,५४,९७४.११/- | महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा कोळगांव ता.गेवराई जि.बीड खाते.क्र.५४५२३००२६३१ |

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
सहाय्यक अधीक्षक
**दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बीड**




# दहेगाव खुर्द येथे 'आदर्श शिवजयंती उत्सव' मोठ्या उत्साहात संपन्न

अंबड ।प्रतिनिधी

तालुक्यातील दहेगाव खुर्द येथे सोमवार,२३ फेब्रुवारी रोजी 'आदर्श शिवजयंती उत्सव २०२६' अत्यंत उत्साही आणि भक्तीमय वातावरणात पार पडला.सकाळी ८ वाजता ढोल-ताशांच्या गजरात आणि 'जय भवानी,जय शिवाजी'च्या जयघोषात भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली,ज्यामध्ये अबालवृद्धांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

सायंकाळी ६ ते ८ या वेळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.ज्यातून शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा देण्यात आला.या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे संघर्ष योद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांनी या कार्यक्रमाला फोनद्वारे उपस्थितांशी संवाद साधला आणि शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.त्यांच्या मार्गदर्शनाने उपस्थित शिवप्रेमींमध्ये मोठा उत्साह संचारला होता.रात्री ९ ते ११ या वेळेत आळंदी येथील प्रसिद्ध युवा कीर्तनकार व समाजप्रबोधनकार ह.भ.प. दिनेश महाराज उंडे यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले. आपल्या ओघवत्या वाणीतून त्यांनी शिवरायांचे विचार आणि आजच्या काळातील समाजप्रबोधनाची गरज यावर प्रभावी भाष्य केले.

हा संपूर्ण सोहळा शिवस्वराज्य ग्रुप व समस्त गावक़री मंडळी,दहेगाव खुर्द यांच्या वतीने अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आणि मोठ्या नियोजनासह पार पाडण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गावातील तरुणांनी आणि ज्येष्ठ नागरिकांनी विशेष परिश्रम घेतले,ज्यामुळे परिसरात या उत्सवाची मोठी चर्चा आहे.

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१८ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुमेरा फेरोज शेख | मुलगी | २०.११.२००० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१६ दि.०५.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अशरफ फेरोज शेख | मुलगा | ०६.०१.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१७ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अब्दुल्ला अशरफ शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | फेरोज अब्दुल्ला शेख | मुलगा | १७.१२.१९७८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१३ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दूल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आमेर फेरोज शेख | मुलगा | १४.०४.१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१४ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सानिया फेरोज शेख | मुलगी | ०७.१२.२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१५ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिमा फेरोज शेख | मुलगी | २०.०५.१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# अनिकेत लोहिया यांना डॉ.दादा गुजर समाज कार्य पुरस्कार जाहीर

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

महाराष्ट्र आरोग्य मंडळाचा डॉ. दादा गुजर समाज कार्य पुरस्कार मानवलोकचे कार्यवाह अनिकेत लोहिया यांना नुकताच जाहीर झाला आहे. मानवलोकचे संस्थापक डॉ.द्वारकादासजी लोहिया यांनी महाराष्ट्र आरोग्य मंडळाच्या माध्यमातून ग्रामीण पुनर्निर्माणाची सुरुवात केली होती.अनिकेत लोहिया यांनी डॉ.द्वारकादासजी लोहिया यांच्या विचारांचा व कार्याचा वारसा अतिशय समर्थपणे पुढे नेत आहेत. आज पर्यंत मिळालेले पुरस्कार व नुकताच जाहीर झालेला डॉ. दादा गुजर समाज कार्य पुरस्कार ही त्याचीच पावती आहे.सदरील पुरस्काराचे वितरण ३ मार्च रोजी होणार असल्याचे समजते. लोहिया यांना जाहीर झालेल्या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.



# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व कागदपत्र वाटप अभियान

महाराष्ट्र शासन व भटके विमुक्त विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमानाने २५० लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र व राशन कार्ड वाटप

शिरूर कासार ।प्रतिनिधी

शिरूर कासार येथील सिद्धेश्वर संस्थान येथे महाराष्ट्र शासन व भटके विमुक्त विकास परिषद यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व कागदपत्र वाटप अभियान अंतर्गत शिरूर कासार तालुक्यातील सुमारे २५० लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र , राशन कार्ड हे अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांच्या हस्ते उपस्थित लाभार्थ्यांना वाटप करण्यात आले.

या कार्यक्रम प्रसंगी ह भ प विवेक महाराज शास्त्री,अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, मुख्याधिकारी गणेश दहिफळे, ना. तहसीलदार विजय इंगळे, पुरवठा अधिकारी शिवदास गावडे, मंडळ अधिकारी नीलकंठ सानप, तलाठी कृष्णा रत्नपारखे, नगराध्यक्ष रोहिदास पाटील गाडेकर, नगरसेवक दत्ता पाटील गाडेकर, नगरसेवक गणेश बाप्पा भांडेकर, ड.समीर पठाण, ड.भाग्यश्री ढाकणे, आसाराम माने, यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी भटके विमुक्त विकास परिषदेचे पदाधिकारी उमेश जोगी,बालाजी पवार,ओम प्रकाश गिरी,भगवान पवार,बबन गिरी,महेश गिरी,यांचे सह तालुका संयोजक बाळासाहेब गाडेकर, अर्जुन चव्हाण,कमलाकर वेदपाठक यांनी या कार्यक्रमासाठी परिश्रम घेतले.

अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी जाणून घेतल्या समस्या व स्थानिक अधिकाऱ्यांचे टोचले कान..!

अप्पर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम समताच लगेच सिद्धेश्वर संस्थान लगतच असलेल्या वॉर्ड क्रमांक १५ मध्ये जाऊन येथील असलेल्या नागरिकांच्या विविध समस्या जाणून घेतल्या आणि त्या समस्याचे तात्काळ निकारण करण्यात यावे असे स्थानिक प्रशासनाला सुचित केले.




# श्री सिद्धेश्वर संकुलात परमपूज्य गोळवलकर गुरुजी त्रिदिवसीय व्याख्यानमालेचे आयोजन

माजलगाव ।प्रतिनिधी

भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर शैक्षणिक संकुल माजलगाव येथे दिनांक २७ फेब्रुवारी, २८ फेब्रुवारी व १ मार्च २०२६ या कालावधीत प्रति वर्षीप्रमाणे याही वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक परमपूज्य गोळवलकर गुरुजी यांच्या स्मृति प्रित्यर्थ व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. व्याख्यानमालेचे हे २१ वे वर्षे आहे. यानिमित्त दिनांक २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता योगेश सोमन (प्रसिद्ध सिने अभिनेते तथा राष्ट्रीय विचारवंत, मुंबई) यांचे भारतीय संस्कृतीवरील आघात या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे.

तसेच दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक २८ फेब्रुवारी शनिवार रोजी भरत अमदापुरे (प्रसिद्ध लेखक, सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रीय विचारवंत पुणे) यांचे वाटचाल विकसित भारताची या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे तर तिसऱ्या दिवशी म्हणजेच दिनांक १ मार्च रविवार रोजी ब्रिगेडियर हेमंत महाजन (निवृत्त भारतीय सेना अधिकारी, पुणे) यांचे ऑपरेशन सिंदूर : सामर्थ्य भारताचे या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. ही व्याख्यानमाला श्री सिध्देश्वर महाविद्यालयाच्या परिसरामध्ये दररोज सायंकाळी ६ वाजता संपन्न होणार आहे.

तरी या तीन दिवशीय व्याख्यानमालेस माजलगाव व माजलगाव परिसरातील डॉक्टर, वकिल, पत्रकार, प्रतिष्ठित नागरिक, पालक तसेच शैक्षणिक संकुलाचे माजी विद्यार्थी , श्रोत्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन व्याख्यानमालेचे अध्यक्ष अभय कोकड, व्याख्यानमालेचे कार्यवाह प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, केंद्रीय कार्यकारणी सदस्य तथा पालक प्रकाश दुगड, केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे, श्री सिध्देश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, कार्यवाह ॲड. विश्वास जोशी, माध्यमिक शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत भानप, प्राथमिक शालेय समितीचे अध्यक्ष पवन मानधने, शिशुविहार विभागाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जोशी, सी.बी.एस.सी. विभागाचे अध्यक्ष तेजस महाजन, माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर, प्राथमिक



विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुमती भारती, शिशुविहार विभागच्या प्रमुख वर्षा कुलकर्णी, सी.बी.एस.सी. प्राचार्य वंदना मिटकरी तसेच स्थानिक पदाधिकारी यांनी केले आहे.

# गेवराई येथे पतसंस्था संचालक, कर्मचारी सहकारी प्रशिक्षण वर्ग संपन्न

बीड/प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे चे सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर,मा.जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था बीड यांच्या संयुक्त विद्यमाने गेवराई तालुक्यातील नागरी, ग्रामीण,कर्मचारी पत संस्थेतील संचालक, कर्मचारी यांच्याकरिता दि.२३ फेब्रुवारी ते दि.२४ फेब्रुवारी २०२६ रोजी दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण घेण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लक्ष्मीनारायण अट्टल चेअरमन जयप्रकाश नागरिक सहकारी संस्था मर्यादित गेवराई,तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक दीपक पवळ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गेवराई यांच्या हस्ते राष्ट्रसंत श्री गाडगे महाराज यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आले.दोन दिवसीय प्रशिक्षणात पहिल्या सत्रात श्री.पी.ए. कदम सहकार विकास अधिकारी बीड जिल्हा सहकारी बोर्ड लिमिटेड बीड यांनीप्रशिक्षणार्थींची नोंदणी व सहकारी संस्थेचे संचालक, कर्मचारी यांना सहकारी प्रशिक्षणाची गरज,हेतू स्पष्ट सांगितला तसेच दीपकजी पवळ यांनी तालुक्यातील सहकारी संस्थांना सविस्तर मार्गदर्शन करून कायदेशीर बाबीच्या सूचना देण्यात आल्या.त्यानंतर कर्ज वाटप व्यवस्थापन,कर्ज वसुली कलम १०१ मधील तरतुदी,पतसंस्था कामकाजाचे व्यवस्थापन या विषयावर जयप्रकाश शर्मा



मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा नागरी सहकारी बँक यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.मध्यांतर नंतर बीड जिल्ह्यातील मार्गदर्शक सहकार व्याख्याते तज्ञ खोडसे सी.ए.प्रमाणित लेखापरीक्षक सहकारी संस्था बीड यांनी ठेवी सुरक्षितता,कर्ज वाटप करताना कायदेशीर बंधने,एनपीए,थकबाकी दारावर कायदेशीर कार्यवाही,पतसंस्था लेखापरीक्षण माहिती निकष,पतसंस्था एम. आय.एस.माहिती निकष,अशा विविध विषयावर सविस्तर मोलाचे मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी सहकार प्रशिक्षण केंद्र लातूरचे प्राचार्य बी.जे.ठोंबरे यांनी नियामक मंडळाचे संपूर्ण माहिती,तत्कालीन सहकार कायद्यातील झालेले बदल,नवीन शासकीय परिपत्रक, कायदेशीर बाबी व्यवस्थापन समितीचे कामकाज याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. समारोप समारंभाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री दीपकजी पवळ सहाय्यक निबंधक सहकारी संस्था गेवराई, लक्ष्मीनारायण जी अट्टल यांच्या हस्ते प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन,आभार प्रदर्शन संयोजक श्री.पी. ए.कदम सहकार विकास अधिकारी बीड जिल्हा बोर्ड सहकारी बोर्ड लि. बीड यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन व यशस्वीरित्या पार पाडण्यात जयप्रकाश नागरी सहकारीपतसंस्था मर्यादित गेवराई यांचे संचालक मंडळ, चेअरमन,सचिव, कर्मचारी वृंद यांनी मोलाचे सहकार्य केले.

# लिंबागणेश प्राथमिक आरोग्य केंद्रात नेत्र तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दि.२४ मंगळवार रोजी मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. सूर्या नेत्रालय येथील नेत्रतज्ज्ञ डॉ. अंजली गायकवाड यांच्या सहकार्याने हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.या शिबिराचे उद्घाटन डॉ. गणेश ढवळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, पत्रकार हरिओम क्षीरसागर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली चिटकुलवार, डॉ. ऋषिकेश आंधळे, डॉ. प्रमोद गोरे (सीएचओ, बोरखेड), आरोग्य निरीक्षक अशोक लोखंडे, आरोग्य सेवक वीर सापते, प्रयोगशाळा तज्ञ ऋषिकेश शेळके, औषध निर्माता जे. एस. कंचार, परिचारिका सोनाली शिंदे, व्ही. बी. भांडवलकर, एल. एच. कर्मचारी सुरेश अवसरे तसेच सेविका ज्योत्स्ना शिंदे यांनी विशेष सहकार्य केले.या नेत्र तपासणी शिबिरामुळे ग्रामस्थांमध्ये डोळ्यांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण झाली असून, भविष्यातही अशा आरोग्यविषयक उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## सहायक निबंधक सहकारी संस्था ता. माजलगाव जि. बीड यांचे कार्यालय

**पत्ता:-शाहुनगर,, ता. माजलगावाजि. बीड**

**जा.क्र. विकास-४/कलम १०१/ना. पतसंस्था/२०२६१२६/२६**

**दिनांक : २४.०२.२०२६**

**महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम ८६ (ब) (४) अन्वये जाहीर नोटीस**

अर्जदार वादी संस्था रत्नसुंदर अर्बन को. ऑप. क्रेडीट सोसायटी लि. माजलगाव ता. माजलगाव जि. बीड यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील थकबाकीदार/ कर्जदारांविरुध्द वसुली प्रमाणपत्र देण्यासाठी दि. १८.१२.२०२५ रोजी या कार्यालयाकडे अर्ज केला. या कार्यालयाने खालील अ.क्र. १ ते ०५ व्यक्तींना दि. ०९.०१.२०२६ व ०९.०२.२०२६ रोजी डाक नोंद पोंहच देय व्दारा नोटीस पाठवून दि. २८.०१.२०२६ व दि. १७.०२.२०२६ रोजी या कार्यालयात आपले म्हणणे सादर करण्यास कळविले. तसेच अ.क्र. ६ व ७ या व्यक्तींना दि.१९.०१.२०२६ व ०९.०२.२०२६ रोजी डाक नोंद पोहच देय व्दारा नोटीस पाठवून दि.०४.०२.२०२६ व १७.०२.२०२६ रोजी या कार्यालयात आपले म्हणणे सादर करण्यास कळविले. परंतु ब-याच थकबाकीदार कर्जदारांना डाकेव्दारे नोटीस देवूनही ती परत आली /घेण्यास इन्कार केला.

करीता खालील कर्जदार व्यक्तींना सुचित करण्यात येते की, आपण स्वतः किंवा वकीलामार्फत दि. १०.०३.२०२६ रोजी दुपारी ठीक ०१.०० वा या कार्यालयात हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे. वरील तारखेस आपण या कार्यालयात हजर न झाल्यास/आपले लेखी म्हणणे सादर न केल्यास या कार्यालयाच्या स्तरावर एकतर्फी निर्णय देण्यात येईल. सदरील प्रकरणी संबंधीतानी याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | दावा क्र. | तपशील | कर्जदाराचे नाव | थकबाकी रक्कम रू. | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ३३/२५ | कर्जदार | परमेश्वर नारायण मुंडे रा. पहाडी दहीफळ ता.धारुर जि.बीड | १२७०१९५/- | |
| | | जामीनदार | नवनाथ सोमनाथ इरमले रा. पहाडी दहीफळ ता.धारुर जि.बीड | | |
| | | जामीनदार | अंडील सुरेश आश्रुबा रा. पहाडी दहीफळ ता.धारुर जि.बीड | | |
| ०२ | ३४/२५ | कर्जदार | शेख कमालपाशा रौफ मु.पो. पात्रुड ता. माजलगाव जि.बीड | ४९९६८४/- | |
| | | जामीनदार | बागवान उस्मान इस्माईल मु.पो. पात्रुड ता. माजलगाव जि.बीड | | |
| | | जामीनदार | शेख मीना खलील रा. पावर हाऊस रस्ता, माजलगाव ता. माजलगाव जि.बीड | | |
| ०३ | ३५/२५ | कर्जदार | चव्हाण तानाजी लिंबाजी मु.बाराभाई तांडा पो. राजेगाव ता. माजलगाव जि.बीड | ३९९२३३/- | |
| | | जामीनदार | सुनिल संतराम चव्हाण मु.बाराभाई तांडा पो. राजेगाव ता. माजलगाव जि. बीड | | |
| | | जामीनदार | चव्हाण शरद तानाजी मु. बारभाई तांडा पो. राजेगाव ता. माजलगाव जि. बीड | | |
| ०४ | ३६/२५ | कर्जदार | डाके राहुल मुक्तीराम रा. पिंप्री खुर्द पो. हिवरा गोवर्धन ता. माजलगाव जि.बीड | २९१०८६/- | |
| | | जामीनदार | जगताप गणेश नारायण रा. सावरगाव पो. मंगरुळ नं.१ ता. माजलगाव जि.बीड | | |
| | | जामीनदार | डाके अतुल लहुराव रा.पिंप्री खुर्द पो. हिवरा गोवर्धन ता. माजलगाव जि. बीड | | |
| ०५ | ३७/२५ | कर्जदार | चव्हाण शरद तानाजी मु.बाराभाई तांडा पो. राजेगाव ता. माजलगाव जि. बीड | २२४१६२/- | |
| | | जामीनदार | चव्हाण तानाजी लिंबाजी मु.बाराभाई तांडा पो. राजेगाव ता. माजलगाव जि. बीड | | |
| | | जामीनदार | सुनिल संतराम चव्हाण मु.बाराभाई तांडा पो. राजेगाव ता. माजलगाव जि. बीड | | |
| ०६ | ०१/२६ | कर्जदार | सोळंके प्रदिप भगवान, स्वामी विवेकानंद नगर, माजलगाव ता. माजलगाव जि.बीड | ५९८९३६/- | |
| | | जामीनदार | चव्हाण प्रशांत रमेश रा. पिताजी नगरी, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड | | |
| | | जामीनदार | झरेकर सुरेश विष्णुपंत रा.बायपास रोड,छत्रपती नगर, माजलगाव ता. माजलगाव जि.बीड | | |
| ०७ | ०२/२६ | कर्जदार | खळगे अमोल मारोती मु.पो. भिमनगर, माजलगाव ता. माजलगाव जि. बीड | ८०८६२/- | |
| | | जामीनदार | कायतवाड राजेंद्र विठ्ठलराव मु.पो.हॉन नं.१३१५/१ गोपाळधाम, बायपास रोड ता. माजलगाव जि.बीड | | |
| | | जामीनदार | वाघमारे विश्वास वामनराव मु.पो. गजानन नगर , माजलगाव ता. माजलगाव जि.बीड | | |

**स्वाक्षरित/-**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था**
**ता.माजलगांव जि.बीड**

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत प्राथमिक शाळा पांढरीचा दणदणीत विजय

## रिले २५ बाय १०० मीटरमध्ये प्रथम क्रमांक;उंच उडीत संभव शेळके अव्वल

आष्टी - (राजेंद्र लाड) जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत आष्टी तालुक्याचे प्रतिनिधित्व करताना जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पांढरी, ता. आष्टी, जि. बीड येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत तालुक्याचा मान उंचावला आहे. रिले २५ बाय १०० मीटर या सांघिक स्पर्धेत पांढरी शाळेच्या संघाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत विजेतेपद मिळवले.



या विजयी संघात जयंत सुनिल हबर्डे, संभव बापू शेळके, माऊली रमेश कन्हेरे आणि सिद्धांत भाऊसाहेब पन्हाळकर या विद्यार्थ्यांचा समावेश होता. सर्व विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट समन्वय, वेग आणि आत्मविश्वासाच्या जोरावर प्रतिस्पर्धी संघांवर मात करत हा मानाचा किताब मिळवला. त्यांच्या या यशामुळे शाळा आणि आष्टी तालुक्याचे नाव जिल्हास्तरावर झळकले आहे.

याशिवाय, उंच उडी या वैयक्तिक क्रीडा प्रकारातही पांढरी शाळेचा विद्यार्थी संभव बापू शेळके याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून दुहेरी यश संपादन केले. त्याच्या सातत्यपूर्ण सराव, चिकाटी आणि जिद्दीच्या जोरावर त्याने ही उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. या सर्व विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल पांढरी ग्रामस्थांच्या वतीने तसेच शाळेच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले.

सरपंच सुधीर आबा पठाडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप शेळके, उपसरपंच गणेश शेळके, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष गोवर्धन शेंबडे, उपाध्यक्ष निशिकांत वांढरे, बंडू भोगाडे, प्रकाश हंबर्डे, संजय शेळके, रमेश भोगाडे, दादासाहेब वांढरे, मुख्याध्यापक पद्मनाथ गर्जे यांच्यासह शिक्षक आजिनाथ पाचे, पोपट भोरे, श्रीमती रुक्मीण करपे, श्रीमती रत्नमाला जेवे, श्रीमती अनिता धस आणि सर्व पालक व ग्रामस्थ पांढरी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तसेच गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे व तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रातूनही विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या दैदिप्यमान यशामुळे पांढरी शाळेच्या क्रीडा परंपरेला नवे बळ मिळाले असून भविष्यातही अशाच यशाची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मातृभूमी तर्फे रविवारी वंजारी वधु-वर राज्यस्तरीय परिचय मेळावा

बीड ।प्रतिनिधी

मातृभूमी प्रतिष्ठान संचलित, अखिल भारतीय संत भगवानबाबा वंजारी समाज वधु-वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु-वर, वंजारी परिवार, वंजारी समाज महाराष्ट्र वार्षीक अंक छत्रपती संभाजीनगरच्या वतीने आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा, १८ वा राज्यस्तरीय सर्व शाखीय वंजारी वधु-वर परिचय मेळावा तसेच आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण व इतर क्षेत्रातील गुणवंतांचा गौरव सोहळा रविवार दि.१ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते सायं.५ दरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायभवन सभागृह, नगर रोड, बीड येथे आयोजित केला आहे. या सर्व कार्यक्रमास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे यांनी केले आहे.

मातृभूमी प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित कार्यक्रमाचे उद्घाटन महंत ह.भ.प.राधाताई महाराज आईसाहेब यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ह.भ.प.मोहन महाराज खरमाटे हे असणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमाच्या सकाळच्या प्रथम सत्रामध्ये

सकाळी १०.३० ते १२.३० या कालावधीत मातृभूमी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण व विविध क्षेत्रातील गुणवंतांचा गुणगौरव सोहळा संपन्न होणार आहे. त्याचबरोबर सकाळी पहिल्या सत्रात सकाळी १० ते १ या दरम्यान वधू-वर नोंदणी करण्यात येणार आहे. तर दुसर्या सत्रामध्ये दुपारी १२.३० ते १.३० वा. स्नेहभोजन होणार आहे. त्यानंतर दुपारी १.३० ते ५.३० या कालावधीत वधु-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच वंजारी समाज महाराष्ट्र वार्षिक अंकाचे प्रकाशन याच प्रथमसत्र कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहे. मातृभूमी प्रतिष्ठान संचलित, अखिल भारतीय संत भगवानबाबा वंजारी समाज वधु-वर नोंदणी महासंघ तथा वंजारी विश्व वधु-वर परिचय मेळाव्याच्या माध्यमातून आतापर्यंत १५५० रेशीमगाठी जुळवून त्यांचे विवाह संपन्न झाले आहेत. तसेच प्रतिष्ठान मार्फत गेल्या १७ वर्षामध्ये विविध क्षेत्रातील जवळपास २ हजार गुणवंतांचा आतापर्यंत सत्कार केलेला आहे.

तरी वरील कार्यक्रमास समाज बांधव, शिक्षक, गुणवंत विद्यार्थी यांनी मोठया संख्येने उपस्थित रहाण्याचे आवाहन संयोजन समितीच्यावतीने डॉ.संजय तांदळे, प्रा.ज्ञानेश्वर वाघ, रामदास हांगे, इंजि.उत्तमराव मिसाळ, प्रा.डी.जी.तांदळे, बाबा जायभाये, बाजीराव ढाकणे, पांडुरंग जायभाये, प्रा.बाळासाहेब नागरगोजे, लक्ष्मण चाटे, प्रा.बिभीषण चाटे, राजेंद्र तिडके, मोहनराव सिरसाट, गणेश सानप, रवींद्र मुंडे, प्रा.अशोक नागरगोजे, श्रीराम ढाकणे, संतोष गर्जे, आत्माराम वाव्हळ, उध्दव लाड आदींनी केले आहे.

# धूम्रपान आणि बैठ्या जीवनशैलीमुळे वाढतोय रक्ताच्या गुठळ्यांचा धोका

सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत धूम्रपान करणे आणि तासन्तास एकाच ठिकाणी बसून काम करणे ही केवळ वाईट सवयच नाही, तर ती गंभीर आजारांना आमंत्रण देत आहे. तज्ज्ञांच्या मते, या दोन्ही सवयींमुळे शरीरात रक्ताच्या गाठी (ब्लड क्लॉट्स) तयार होण्याचा धोका मोठ्या प्रमाणात वाढतो. परिणामी डीप वेन थ्रॉम्बोसिस (ऊतढ) आणि जीवघेणा पल्मोनरी एम्बोलिझम यांसारख्या आजारांचा धोका निर्माण होतो.

हल्ली कामाच्या ठिकाणी जास्त काळ बसून राहणे, वारंवार प्रवास करणे आणि धूम्रपानासारख्या सवयींचे प्रमाण वाढले आहे. यामुळे रक्ताच्या गुठळ्या होण्याचा धोका वाढू शकतो. हे गुठळ्या बहुतेकदा कोणतीही लक्षणं न आढळता विकसित होतात आणि गंभीर गुंतागुंत उद्भवल्यावरच लक्षात येऊ शकतात. म्हणून वेळीच मदत घेणे गरजेचे आहे.

अशा प्रकारे धूम्रपान आणि जास्त वेळ एकाच ठिकाणी बसून काम करणे यामुळे रक्ताच्या गुठळ्या होतात. जेव्हा एखादी व्यक्ती डेस्कवर, लांबच्या प्रवासात गाडी चालवताना किंवा विमान प्रवासात बराच वेळ बसावे लागल्यास पायांमधील रक्त प्रवाह मंदावतो. त्यामुळे रक्ताच्या गुठळ्या होण्याची शक्यता वाढते, विशेषतः पायांच्या नसांमध्ये गुठळ्या होण्याचा धोका वाढतो. धूम्रपान केल्याने हा धोका आणखी वाढतो. तंबाखूमधील रसायनं हे रक्तवाहिन्यांच्या आतील आवरणांना नुकसान पोहोचवतात, रक्ताच्या गुठळ्या होण्यास कारणीभूत ठरतात. रक्त प्रवाह कमी होणे आणि रक्तवाहिन्यांना होणारे नुकसान यामुळे गुठळ्या तयार होणे तसेच एखाद्या व्यक्तीच्या गतिशीलतेवर परिणाम होतो. यामुळे रुग्णांना त्यांच्या दैनंदिन कामात अडथळा येतो. या स्थितीला सामान्यतः डीप व्हेन थ्रोम्बोसिस (ऊतढ) म्हणून ओळखले जाते, ही एक गंभीर स्थिती आहे जिथे रक्ताची गुठळी खोल नसामध्ये, सहसा पायांमध्ये तयार होते आणि सूज, वेदना, उष्णता, त्वचेचा लालसरपणा किंवा रंग बदलणे आणि लालसरपणा यासारखी लक्षणे असू शकतात. शिवाय, वेळेवर लक्ष देणे आवश्यक आहे. जर या गुठळ्याचा फुफ्फुसांपर्यंत पोहोचल्या तर पल्मनरी एम्बोलिझम (झए) होऊ शकतो, जा एक वैद्यकीय आणीबाणी आहे. यामुळे दम लागणे, छातीत दुखणे, हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे, चक्कर येणे किंवा खोकल्यातून रक्त येणे अशी लक्षणं दिसतात.वेळेवर उपचार न केल्यास रक्ताच्या गुठळ्यांमुळे फुफ्फुसातील एम्बोलिझम, पायांना सूज आणि वेदना आणि त्वचेवर अल्सर यासारख्या परिस्थिती कारणीभूत ठरतात तर, गंभीर प्रकरणांमध्ये अचानक मृत्यू ओढावू शकतो. वारंवार रक्ताच्या गुठळ्या झाल्यामुळे रक्तवाहिन्यांचे नुकसान होण्याची शक्यता वाढते.

असे करा व्यवस्थापन:

हे समजून घेणे गरजेचे आहे की उपचार हे रक्ताच्या गुठळ्याच्या आकारावर आणि स्थानावर अवलंबून असतात. रक्ताच्या गुठळ्यांचा आकार वाढण्यापासून रोखण्यासाठी आणि नवीन गुठळ्या होण्याचा धोका कमी करण्यासाठी तज्ञ रक्त पातळ करणारी औषधे देखील लिहून देतील. गंभीर प्रकरणांमध्ये, रुग्णाला ठराविक प्रक्रिया किंवा इंजेक्शन्स घेण्याचा सल्ला दिला जाऊ शकतो. वेळीच निदान ही पुनर्प्राप्तीसाठी आणि दैनंदिन दिनचर्या पुर्ववत सुरू करण्यासाठी महत्त्वाचे ठरते.रक्ताच्या गुठळ्या रोखणे गरजेचे असून जास्त वेळ एका ठिकाणी बसणे अथवा उभे राहणे टाळावे , अधुनमधुन स्ट्रेचिंग करणे किंवा दर ६० मिनिटांनी जागेवरुन उठून चालणे योग्य राहिल. धूम्रपानासारखी वाईट सवय सोडा, हायड्रेटेड रहा, वजन नियंत्रित राखा आणि नियमित व्यायाम करा. लांबच्या प्रवासादरम्यान, रक्ताच्या गुठळ्या टाळण्यासाठी ब्रेक घ्या, पायांची हालचाल करा आणि कॉम्प्रेशन स्टॉकिंग्जचा वापर करा.

# नांदेड-देगलूर हरित उच्चगती महामार्गाला मंजुरी

देगलूर ।प्रतिनिधी

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणने नांदेड ते देगलूरदरम्यान नव्या हरित क्षेत्रातील उच्चगती महामार्ग उभारणीसाठी महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. या प्रकल्पासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यास मान्यता देत प्राधिकरणाने 'स्वीकृतीपत्र' जारी केले आहे. नऊ जानेवारी २०२६ रोजी काढलेल्या आदेशानुसार भोपाळस्थित एम. एस. एल. एन. मालवीय इन्फ्रा प्रोजेक्ट्स प्रा. लि. या संस्थेची सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, कराराची एकूण रक्कम ५ कोटी ८ हजार रुपये निश्चित करण्यात आली आहे.

या नियोजित प्रकल्प अहवालात नांदेड-देगलूर हरित क्षेत्रातील उच्चगती मार्ग उभारणीसह जालना-नांदेड द्रुतगती मार्गाला जोडणारा उपमार्ग, औसा शहरातील उड्डाणपूल तसेच वरंगा फाटा टी-जंक्शन येथे उड्डाणपूल अथवा वलयाकार संगम मार्ग उभारणीचा समावेश करण्यात येणार आहे. या प्रकल्पाची व्याप्ती लक्षात घेता मराठवाड्यातील दळणवळणाच्या दृष्टीने विकास प्रक्रियेत हा निर्णय महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

नांदेड-देगलूर उच्चगती महामार्ग हा सीमा भागांच्या विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल. पुढील टप्प्यात जमीन संपादन आणि निधी प्रक्रियेला गती देण्यासाठी राज्य स्तरावरून केंद्र शासनाकडे पाठपुरावा करणार असल्याचे आमदार जितेश अंतापूरकर यांनी सांगितले.




### पंधरा दिवसांत बँक हमीची अट

प्राधिकरणाने संस्थेला स्वीकृतीपत्राच्या तारखेपासून १५ दिवसांत करार मूल्याच्या १० टक्के म्हणजे ५० लाख ८ हजार रुपयांची बिनशर्त बँक हमी (कार्यक्षमता हमी) सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच तांत्रिक मूल्यमापनात किमान ७० टक्के गुण न मिळालेल्या चार तज्ज्ञांच्या जागी पात्र तज्ज्ञांची नियुक्ती करूनच अंतिम करार करण्याची अट घालण्यात आली आहे.

तांत्रिक मूल्यमापनात उणीवा

या प्रस्तावातील काही पदांना अपेक्षित गुण मिळाले नसल्याचे नमूद करण्यात आले आहे. यामध्ये वाहतूक व रस्ता चिन्हांकन तज्ज्ञ, वरिष्ठ सर्वेक्षण अभियंता, परिमाण सर्वेक्षण तज्ज्ञ तसेच भू-तांत्रिक तज्ज्ञ या पदांचा समावेश आहे. संबंधित पदांसाठी नव्याने पात्र तज्ज्ञ सुचविणे बंधनकारक करण्यात आले आहे.

### सीमाभागाच्या विकासाला चालना

नांदेड-देगलूर हा भाग तेलंगणा, कर्नाटक, आंध्र सीमेलगत असून कृषी, व्यापार आणि शैक्षणिक दळणवळणासाठी महत्त्वाचा आहे. सध्याच्या मार्गावरील वाहतूक कोंडी, अपघातांचे वाढते प्रमाण आणि वाढती वाहनसंख्या लक्षात घेता पर्यायी उच्चगती मार्गाची मागणी सातत्याने होत होती. नव्या महामार्गामुळे प्रवासाचा कालावधी कमी होऊन औद्योगिक व व्यापारी विकासाला चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.





आष्टी - राज्यातील १४२३४ मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतवर प्रशासक म्हणून कार्यकाळ संपणाऱ्या सरपंचांचीच नियुक्ती करावी याकरीता मा.ना.श्री.जयकुमार गोरे, मा.श्री.श्रीकांत भारतीय यांनी राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली होती. सदर विनंती मुख्यमंत्री मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेबांनी मान्य केली. याबद्दल सरपंच परिषदेच्या राज्यातील पदाधिकाऱ्यांनी प्रदेशाध्यक्ष श्री.दत्ताभाऊ काकडे यांच्या समवेत त्यांची भेट घेऊन आभार मानले.



### अरहान आरेफ बागवान यांनी जीवनाचा पहिला रोजा पूर्ण केला.

पोलिस स्टेशन गेवराई येथे कर्तव्य पार पाडणारे आरेफ बागवान यांचा मुलगा अरहान बागवान याने वयाच्या ७ व्या वर्षी आपल्या जीवनाचा पहिला रोज पूर्ण केला आहे एवढ्या कमी वयात रोजा पूर्ण केल्याबद्दल अरहान बागवान याचे बागवान बिरादरी व मित्र परिवार यांच्या कडून अभिनंदन होत आहे.अरहान बागवान ने पहिला रोजा पूर्ण केल्याबद्दक त्यांचे अभिनंदन परिवार व मित्र परिवार.

# जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षकांचा गुंडाला दणका !

## बीड शहरात गुंडगिरी करणाऱ्या एका धोकादायक गुंडाची एमपीडीए कायद्याअंतर्गत हर्मुल कारागृहात रवानगी

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्हयाची - सांभाळल्या पासुन शर्थीचे प्रयत्न चालवले आहेत त्यांना बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांची खंबीर साथ लाभली ह.

बीड जिल्ह्यातील गुंडगिरीचे व गुन्हेगारीचे व वाळु माफीयांचे समुळ उच्चाटन करण्याचा उदात्त दृष्टीकोन डोळ्यासमोर ठेवून चझऊ- व उजउ- कायद्या अंतर्गत बऱ्याच गुन्हेगारांवर व गुंडावर कार्यवाही करण्याचे योजिले आहे. त्या अनुषघांने पोलीस अधीक्षकांच्या सुचनेवरुन नि, बीड शहर यांनी दि. १६.०१.२०२६ रोजी इसम वैभव संजय वराट वय २५ वर्षे रा. स्वराज्य नगर, बीड यांचे विरुध्द चझऊ- कायद्याअंतर्गत स्थानबद्ध करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक बीड यांच्या मार्फतीने जिल्हादंडाधिकारी साहेब बीड यांना सादर केला होता.

सदर स्थानबध्द इसमा विरुध्द पो.स्टे. बीड शहर येथे चोरी करणे, अवैध शस्त्र बाळगणे, जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करणे, जबरी करणे, खुनाचा प्रयत्न करणे, दुखापत करणे वगैरे स्वरुपाचे एकुण ०९ गंभीर गुन्ह्याची नोंद पोलीस अभिलेखावर आहे. सदर व्यक्तीने आपले न सुधारावे या करीता त्याचेवर कलम १२९ बीएनएसएस अन्वये दिनांक ३०.०९.२०२४ रोजी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली होती तरी चे वर्तणात कसल्याही प्रकारची सुधारना झाली नाही.

सदर प्रकरणात विवेक जॉन्सन जिल्हादंडाधिकारी बीड यांनी दिनांक २३.०२.२०२६ रोजी सदर प्रकरणाच्या अनुषंगाने चझऊ- वद्याअंतर्गत आदेश पारीत करून सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून हर्मुल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करून स्थानबध्दणे बाबत आदेश पारीत केले होते. त्यानंतर पोलीस अधिक्षक बीड यांनी सदर इसमास तात्काळ ताब्यात घेवून कार्यवाही करण्याच्या सुचना धित पो. स्टे. प्रभारी अधिकारी व पो.नि. स्थागुशा बीड यांना दिल्या होत्या. सदर आदेशावरुन पो.नि. स्थागुशा श्री शिवाजी बंटेवाड व चे सहकारी यांनी ताबे पोलीस अंमलदार यांचे मार्फत गोपणीय माहीतीच्या आधारे सदर इसमांस दिनांक २३.०२.२०२६ रोजी १८.३६ वा. यदेशीररीत्या ताब्यात घेऊन पो.स्टे. बीड शहर येथे हजर केले. पो. नि. बीड शहर यांनी सदर इसमास ताबे पोलीस मार्फत दिनांक ०२.२०२६ रोजी हार्सल कारगृह, छत्रपती संभाजीनगर येथे हजर करुन स्थानबध्द केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत (भापोसे), अपोअ बीड, सचिन पांडकर, उविपोअ बीड श्रीमती पुजा बर, पोनि स्थागुशा शिवाजी बंटेवाड, यांचे मागदर्शनाखाली पो. नि. शितलकुमार बल्लाळ, सचिन अलगट पो.स्टे. बीड शहर, पोउपनि खटावकर, पोह/मनोज परझने, शेख अशपाक, सानप, यादव, तसेच सपोउपनि अभिमन्यु औताडे, नेमणुक स्थागुशा बीड यांनी केलेली



भविष्यातही वाळुचा चोरटा व्यापार करणारे, अवैध गुटका विक्री करणारे तसेच जिवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार करणारे व्यक्ती जातीय तथा धार्मीक तेढ निर्माण करणारे समाजकंठक यांचेवर व दादागिरी करणाऱ्या, खंडणी बहाद्दर धोकादायक गुंडावर, बेकायदेशीर पर व लॉटरी चालवणारे व्यक्तीवर जास्तीत जास्त चझऊ- व चउजउ- कायदयाअंतर्गत कठोर कारवाई करण्याचे संकेत पोलीस बीक्षक नवनीत कॉवत (भापोसे) यांनी दिले आहेत.



# राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरात व्याख्यानाचे आयोजन

मुक्रमाबाद ।प्रतिनिधी

मुक्रमाबाद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विशेष वार्षिक शिबिर प्राचार्य डॉ विवेक इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली( शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास ) दिनांक २२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२६ या काळात मौजे गोनेगाव येथे सुरू झाले. या शिबिरात दि.२४ फेब्रुवारी रोजी दुपारी तीन वाजता प्रबोधन सत्रात व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन करून स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून डॉ रविंद्र बाविस्कर,डॉ सूर्यकांत सकनुरे हे होते.'भारतीय संविधान आणि आजचा युवक' या विषयावर डॉ सूर्यकांत सकनूरे यांनी सविस्तर व्याख्यान दिले. तसेच डॉ रविंद्र बाविस्कर यांनी 'राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हाने' या विषयी माहिती दिली. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ मा.म.गायकवाड यांनी केला.

या कार्यक्रमास डॉ विलास पवार, सहशिक्षक राठोड सर, चाकूरे साहेब, स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुक्रमाबाद येथील रासेयो स्वयंसेवक-स्वयंसेविका उपस्थित होते. उपस्थितांचे आभार डॉ मादळे रामदास यांनी मानले तर या कार्यक्रमाचे सूत्रसचालन रासेयो सहकार्यक्रमाधिकारी डॉ मादळे रामदास यांनी केले.

# डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा समारोप

## सर्वांच्या अथक परिश्रमामुळे राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन यशस्वी झाले–राजेंद्र धोंडे

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी येथे दिनांक १९ ते २३ फेब्रुवारी दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचा अत्यंत उत्साहपूर्ण व दिमाखदार वातावरणात समारोप झाला. पाच दिवस चाललेल्या या भव्य कृषी प्रदर्शनाने आष्टी तालुक्यापुरते मर्यादित न राहता संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकरी, उद्योजक, महिला बचत गट, कृषी तज्ज्ञ, विद्यार्थी व नागरिकांना एकत्र आणले. संयोजकांनी दिलेल्या माहितीनुसार, या कालावधीत सुमारे २ लाख ३० हजारांहून अधिक नागरिकांनी प्रदर्शनाला भेट देत विक्रमी प्रतिसाद नोंदविला.

समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी युवा नेते अभय राजे धोंडे होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. स्वामीनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन करून राज्यगीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रभावी प्रास्ताविक डॉ. श्रीराम आरसूळ यांनी केले. संस्थेचे प्रशासन अधिकारी प्रा. शिवदास विधाते यांनी प्रदर्शनाच्या नियोजनाची, विविध तांत्रिक सत्रांची, स्टॉल व्यवस्थापनाची व शिस्तबद्ध आयोजनाची सविस्तर माहिती आपल्या मनोगतातून मांडली.

या समारोप सोहळ्यास महेश सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र (राजू काका) धोंडे, आरपीआय आष्टी तालुका अध्यक्ष अशोकरावजी साळवे, पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पांडुरंग नागरगोजे, पंचायत समिती पाटोदा माजी सभापती अनिल जायभाय, माजी जिल्हा परिषद सदस्य सतीश आबा शिंदे, माजी सरपंच संतोष भैय्या चव्हाण, संभाजी जगताप, हरिभाऊ जंजिरे, कुंडलिक आस्वर, व्यवस्थापन मॅनेजर वाबळे सर, युवराज खटके, जिजाऊ मसाले उद्योगाचे प्रमुख बाबासाहेब गर्जे, संस्थेचे प्रशासनाधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, प्रा. सागर वाघुले, प्रा. संदीप नन्नवरे तसेच कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य श्रीराम आरसूळ, सर्व प्राध्यापक, कर्मचारीवृंद, विद्यार्थी, पत्रकार बांधव व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी जि.प. सदस्य सतीश आबा शिंदे यांनी आपल्या भाषणात नमूद केले की, मोठ्या शहरांतील कृषी प्रदर्शनांना प्रवेशासाठी तिकीट घ्यावे लागते; मात्र धोंडे साहेबांच्या संकल्पनेतून आष्टी येथे शेतकऱ्यांसाठी पूर्णपणे विनामूल्य प्रदर्शन आयोजित करण्यात आले, ही अत्यंत स्तुत्य बाब आहे. प्रदर्शनात शेतकऱ्यांना आधुनिक कृषी अवजारे, कीड व्यवस्थापन तंत्रज्ञान, बीज प्रक्रिया, आंतरमशागत यंत्रणा, सौरऊर्जेवर चालणारी उपकरणे तसेच अत्याधुनिक कॅमेऱ्यांद्वारे शेत निरीक्षण प्रणाली यांची माहिती स्टॉलच्या माध्यमातून देण्यात आली. महिलांच्या बचत गटांच्या उत्पादनांना अधिक व्यापक बाजारपेठ मिळावी यासाठी पुढील वर्षी आणखी नियोजनबद्ध उपक्रम राबविण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. उपसभापती पांडुरंग



नागरगोजे यांनी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्याचा गौरव करत आष्टी मतदारसंघ कोरडवाहू असूनही शिक्षण व कृषी क्षेत्रात नवे पर्व सुरू झाल्याचे सांगितले. प्रदर्शनादरम्यान सुमारे साडेपाच लाख रुपयांच्या मसाल्यांची विक्री झाल्याची माहिती देत स्थानिक उत्पादकांना मोठी बाजारपेठ उपलब्ध झाल्याचे त्यांनी समाधान व्यक्त केले. जलव्यवस्थापन, आधुनिक ऊस उत्पादन तंत्रज्ञान, जलजीवन मिशन यांसारख्या योजनांमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले.

राजेंद्र (राजू काका) धोंडे यांनी आपल्या मार्गदर्शनात सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या प्रदर्शनाने राज्यभरातील शेतकऱ्यांना एकत्र आणण्याचे कार्य केले. उद्घाटनानंतर विविध तांत्रिक सत्रे, मार्गदर्शन कार्यशाळा, कृषी तज्ज्ञांची व्याख्याने तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांनी प्रदर्शनाची शोभा वाढवली. कृषी महाविद्यालय आष्टीचे प्रशासन अधिकारी, प्राध्यापक व विद्यार्थ्यांच्या अथक परिश्रमामुळे हा उपक्रम यशस्वी ठरल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

समारोप प्रसंगी सर्व सहभागी स्टॉलधारकांना प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. कृषी अवजारे, बियाणे, खते, सेंद्रिय उत्पादने, प्रक्रिया उद्योग, महिला बचत गट, मसाला उत्पादक, तंत्रज्ञान कंपन्या आदी विविध क्षेत्रांतील स्टॉल्सचा गौरव करण्यात आला. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्राध्यापिका सुजाता बनकर यांनी केले तर प्रा. पोपट काळे यांनी आभार मानले. शेतकऱ्यांसाठी नवी दिशा डॉ. स्वामीनाथन यांच्या कृषी तत्त्वज्ञानाला साजेसा हा उपक्रम शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादनवाढ, प्रक्रिया उद्योग, विपणन कौशल्य व निर्यात संधी यांची नवी दिशा देणारा ठरला. आष्टीपुरता मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या शेतकऱ्यांनी या प्रदर्शनाचा लाभ घेतल्याने हा उपक्रम राज्यस्तरावर आदर्श ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# आष्टी तालुक्यात कडक बंदोबस्तात कॉपीमुक्त परीक्षा

### १७ केंद्रांवर ४,०८३ विद्यार्थी, झूम पमुळे गैरप्रकारांना आळा

आष्टी - (प्रतिनिधी) यंदा आष्टी शहरासह तालुक्यात दहावीच्या परीक्षा कडक बंदोबस्तात आणि पूर्णपणे कॉपीमुक्त वातावरणात पार पडत असून जिल्हा प्रशासनाच्या विशेष अभियानाला यश मिळताना दिसत आहे. १७ परीक्षा केंद्रांवर एकूण ४ हजार ८३ विद्यार्थी परीक्षेला बसले असून सर्व केंद्रांवर शिस्तबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने परीक्षा घेतली जात आहे.

जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात आलेल्या कॉपीमुक्त अभियानामुळे यंदा परीक्षेचे स्वरूप पूर्णपणे बदलले आहे. विशेष म्हणजे झूम पच्या माध्यमातून वर्गातच परीक्षेचे थेट निरीक्षण करण्यात येत असल्याने कॉपी करणाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे. या तंत्रज्ञानाधारित पद्धतीमुळे गैरप्रकारांवर प्रभावी नियंत्रण आले असून कॉपी बहाद्दर धास्तावले आहेत. अलीकडील चौसाळा प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण



बीड जिल्ह्यात प्रशासन अधिक सतर्क झाले आहे. त्यामुळे सर्व परीक्षा केंद्रांवर कडक नजर ठेवण्यात येत आहे. काही ठिकाणी विद्यार्थ्यांना कॉपी पुरवण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती मिळाली असली तरी बंदोबस्तावर तैनात पोलीस कर्मचारी आणि केंद्रांवरील पर्यवेक्षकांनी तात्काळ कारवाई करून ते प्रयत्न हाणून पाडले. त्यामुळे कोणत्याही केंद्रावर ठोस स्वरूपाचा कॉपीप्रकार आढळून आलेला नाही.

आष्टी तालुक्यातील आष्टी व कडा कस्टडी अंतर्गत असलेल्या सर्व १७ परीक्षा केंद्रांवर काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली बैठे पथके व भरारी पथके नियुक्त करण्यात आली असून केंद्रनिहाय जबाबदाऱ्या स्पष्टपणे ठरवण्यात आल्या आहेत. परीक्षा केंद्रांवर मोबाईल वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. तसेच, केंद्र परिसरातील झेरॉक्स मशिन्स बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मागील काही वर्षांत ग्रामीण भागात कॉपीचा सुळसुळाट होत असल्याची तक्रार पालकांकडून होत होती. हुशार विद्यार्थ्यांच्या पालकांनी शिक्षण विभागाने कठोर भूमिका घ्यावी, अशी मागणी वारंवार केली होती.

या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने तंत्रज्ञानाचा वापर करून झूम पच्या माध्यमातून थेट देखरेख व्यवस्था लागू केली. या निर्णयामुळे परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता वाढली असून विद्यार्थ्यांमध्ये प्रामाणिकपणे परीक्षा देण्याची भावना दृढ झाली आहे. पोलिस प्रशासनानेही केंद्रांवर कडक बंदोबस्त ठेवला आहे. परीक्षा काळात संशयास्पद हालचालींवर बारीक लक्ष ठेवले जात आहे. कोणत्याही केंद्रावर कॉपीचा प्रकार आढळल्यास संबंधित केंद्रप्रमुखावर तात्काळ कारवाई करण्यात येईल, असा इशारा गटशिक्षणाधिकारी मोहन काकडे यांनी पत्रकारांशी बोलताना दिला. एकूणच, जिल्हा प्रशासनाने राबवलेला कॉपीमुक्त परीक्षा पॅटर्न आष्टी तालुक्यात यशस्वी होताना दिसत आहे. कडक अंमलबजावणी, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि पोलिसांचा सजग बंदोबस्त यामुळे यंदाच्या दहावीच्या परीक्षा शांततेत आणि पारदर्शक वातावरणात सुरू असून हा आदर्श पॅटर्न जिल्ह्यासाठी मार्गदर्शक ठरत आहे.

# माझ्या दिव्यांग व शिक्षक बांधवांना तसेच गुणी विद्यार्थ्यांना अच्छे दिन यावेत यासाठी रोजा धरणार – राजेंद्र लाड

आष्टी - (प्रतिनिधी) हिंदू, मुस्लिम, शिख, इसाई....हम सब भाई - भाई असे नुसते बोलून चालणार नाही तर प्रत्येक धर्माच्या रितीरिवाजाप्रमाणे सण मोठ्या प्रमाणात साजरे केले जात असतात. प्रत्येक धर्माच्या सणाला अनन्यसाधारण महत्त्व असते. तसेच प्रत्येक धर्माच्या सणामधून वेगवेगळे संदेश दिले जात असतात. सणामुळे एका धर्माचे लोक दुसऱ्या धर्माच्या बांधवांना शुभेच्छा देत असतात. नव्हे नव्हे तर एकमेकांच्या सुख - दुखाःत सामील होत असतात. याच विचाराचा आधार घेवून माझ्या दिव्यांग व शिक्षक बांधवांना तसेच गुणी विद्यार्थ्यांना भविष्यात अच्छे दिन यावेत व दिव्यांग हक्क कायदा २०१६ ची राज्यात कडक अंमलबजावणी व्हावी, दिव्यांगांच्या व शिक्षकांच्या अडीअडचणी दूर व्हाव्यात, गुणी विद्यार्थ्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी, दिव्यांग बांधवांना स्वतःच्या पायावर उभे



राहण्यासाठी समाजाकडून व शासनाकडून सोयी - सवलती मिळाव्यात या उद्दात हेतुने इस्लाम धर्माच्या पवित्र रमजान महिन्यामध्ये दिव्यांगाप्रती व शिक्षकांप्रती तसेच गुणी विद्यार्थ्यांप्रती आदर ठेवून व मनोमन भावना घेवून अल्लाह यांना दुवा मागण्यासाठी सालाबादप्रमाणे शनिवार दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ व रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी दोन दिवसाचा रोजा धरणार आहे. अशी माहिती शासन मान्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक राजेंद्र लाड यांनी दिली आहे.

शाळेमध्ये शिक्षक मुलांना सर्वधर्म समभाव यांची शिकवण देत असतात. पण त्याचा प्रत्यक्षात किती प्रमाणात अवलंब केला जातो हे ज्यांच्या - त्यांच्या शिकवणीवर अवलंबून असते. पण खऱ्याअर्थाने सर्वधर्म समभाव ही मोठमोठाली शब्द वापरुन चालणार नाही तर त्याची स्वतः पासून अंमलबजावणी करणे अभिप्रेत असते. त्यामुळेच मी स्वतः शिक्षक या नात्याने सर्वधर्माच्या सणामध्ये प्रत्यक्ष सामील होत असतोच. तसेच प्रत्येक धर्मामध्ये संस्काराला खुप महत्त्व असते. कोणताही धर्म वाईट विचार सांगत नसून भारतातील सर्व धर्माच्या सणाला खुपच महत्त्व असून त्यातून खऱ्याअर्थाने संस्कार, आचार - विचार, चांगले - वाईट यांची शिकवण दिली जात असते.

याचप्रमाणे सध्या मुस्लिम बांधवांचा रमजान महिना चालू असून रमजान ला इस्लाम धर्मात फारच मोठे स्थान दिलेले असून इस्लाम धर्मानुसार रमजान महिन्यात रोजा धरल्यामुळे आत्मा पवित्र होत असतो व अध्यात्मिक तसेच शारीरिक रुप शुद्ध होत असते. यातून संयम, प्रेम, अनुशासन यांची रुजवणूक होत असते. यामुळेच मुस्लिम बांधव सध्या दिवसभर उपवास करत असतात व अल्लाह यांना दुवा मागत असतात. त्यामुळेच मुस्लिम बांधवांच्या या पवित्र महिन्यातील उपवासात आपणही सामील झाले पाहिजे याच एका उद्दात विचाराने दिव्यांग व शिक्षक बांधवांना तसेच विद्यार्थ्यांना अच्छे दिन यावेत यासाठी व मुस्लिम बांधवांना शुभेच्छा व्यक्त करण्यासाठी दोन दिवसाचा सालाबादप्रमाणेच रोजा धरणार आहे. या दोन दिवासाच्या उपवासाच्या काळात दिव्यांग बांधवांना तन, मन, धनाने मदतही करणार आहे असेही शेवटी राजेंद्र लाड यांनी म्हटले आहे.

# शिवाजी महाराज जयंती निमित्त चिमुकल्यांच्या लेझीम नृत्याने आष्टीकरांची मने जिंकली

### तायराम गळगटे यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाचे सर्वत्र कौतुक



आष्टी - (राजेंद्र लाड) महाराष्ट्राची पारंपरिक, क्रीडाप्रधान आणि वीररसपूर्ण ओळख असलेला लेझीम हा केवळ नृत्यप्रकार नसून शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि सामूहिक एकतेचा सुंदर संगम आहे. ढोल-ताशाच्या दमदार तालावर सादर होणारा हा प्रकार प्रेक्षकांच्या अंगात उत्साह संचारतो. साधारण ३८ ते ४५ सेंमी लांबीच्या लाकडी दांड्याला लोखंडी कड्यांची साखळी व पत्र्याच्या चकत्या बसवून तयार होणाऱ्या या वाद्यावर तालबद्ध हालचाली करत व्यायाम व नृत्य सादर केले जाते.इतिहासात पाहता, लेझीमचा उपयोग छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात सैनिकांच्या शारीरिक तंदुरुस्तीकरिता होत असल्याचे सांगितले जाते. लष्करी, तालठेका आणि सामान्यजन असे लेझीमचे प्रमुख प्रकार प्रचलित आहेत. गणेशोत्सव, जत्रा, संमेलने तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये दोन किंवा चार रांगांत, तसेच वर्तुळाकार मांडणीत लेझीम सादर केली जाते. ढोल, हलगी, ताशा व झांज यांच्या नादलयीशी सुसंगत हालचाली करत हा प्रकार अधिक रंगतदार बनतो.

याच पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा आष्टी नंबर १ येथील विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त आष्टीतील शिवाजी चौक येथील भव्य व्यासपीठावर दिमाखदार सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली. शाळेचे मुख्याध्यापक व आदर्श लेझीम पथक मार्गदर्शक तायराम गळगटे यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी राजा ग बसला घोड्यावरी तसेच सवारी भवानी चौकामध्ये या गीतांच्या तालावर आकर्षक आणि शिस्तबद्ध लेझीम सादर केला.

विशेष बाब म्हणजे स्वतः तायराम गळगटे सरांनीही विद्यार्थ्यांसमवेत लेझीम खेळून कार्यक्रमात उत्साहाची भर घातली. त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वामुळे आणि सातत्यपूर्ण परिश्रमांमुळे विविध कार्यक्रमांत त्यांनी लेझीम पथके तयार करून या पारंपरिक कलेला नेहमीच प्राधान्य दिले आहे.

चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासपूर्ण सादरीकरणामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे आणि मार्गदर्शक तायराम गळगटे यांचे विशेष अभिनंदन केले. या यशस्वी सादरीकरणासाठी आष्टी नं. १ शाळेतील सर्व आदर्श शिक्षकांचेही मोलाचे सहकार्य लाभले.

# अवकाळी व गारपिटीने शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करा

### धनंजय मुंडेंची विधिमंडळात मागणी

महाराष्ट्रात अवकाळी व गारपिटीने नुकसान झालेल्या सर्व जिल्ह्यात तात्काळ सर्व्हेक्षण व पंचनामे करण्याची महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची ग्वाही

मुंबई ।प्रतिनिधी

राज्यात सोमवारी (तारीख २३) झालेल्या वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस व गारपिटीने शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून मराठवाड्यातील बीड, लातूर, परभणी, धाराशिव, नांदेड या जिल्ह्यांसह कोकण व पूर्व विदर्भात रब्बीतील गहू, ज्वारी, हरभरा, भाजीपाला, फळपिके इत्यादींचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने तात्काळ पंचनामे करावेत, अशी मागणी माजी मंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज विधानसभेत पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशन च्या माध्यमातून मांडली.

यावेळी महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी अवकाळी पाऊस व गारपीट झाल्याने शेतीपिकांचे नुकसान झाले आहे त्या सर्व जिल्ह्यातील प्रशासनास तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांच्या माध्यमातून दिले जातील, अशी ग्वाही महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सभागृहात दिली.

अवकाळी पाऊस व गारपीट यामुळे गहू ज्वारी अक्षरशः जमीनदोस्त झाली असून आंबा, डाळिंब या फळांचे मोठे नुकसान झाले आहे. तसेच द्राक्ष, टरबुज अशा फळपिकांना देखील मोठा फटका बसला आहे. त्यामुळे याची तात्काळ दखल शासनाने घेण्याची गरज असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले.

विधिमंडळात स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून आ. विजय वडेट्टीवार यांनी देखील अवकाळी व गारपिटीने झालेल्या नुकसानीचा मुद्दा उपस्थित केला होता. मात्र झालेल्या नुकसानीची व्यापकता अधिक असल्याने धनंजय मुंडे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. आमदार अभिमन्यू पवार यांनीही हा विषय मांडला.

बीड जिल्ह्यातील परळी, अंबाजोगाई यांसह माजलगाव, धारूर, केज इत्यादी तालुक्यांमध्ये देखील अवकाळीचा फटका बसला असून प्रशासनाने तातडीनं पंचनामे करून शासनास नुकसानीचे अहवाल सादर करावेत, अशी आग्रही मागणी धनंजय मुंडे यांनी सभागृहात केली. त्यावर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी उत्तर देत संबंधित नुकसानग्रस्त सर्व जिल्ह्यात तातडीने पंचनामे करण्यात येतील, अशी ग्वाही दिली.

# लाळखुरकुत रोग प्रतिबंधात्मक लसीकरणाचा पशुपालकांनी लाभ घ्यावा – जिल्हा प्रशासन

बीड ।प्रतिनिधी

केंद्र पुरस्कृत पशुस्वास्थ व रोगनियंत्र या समूह गट योजनेमधील राष्ट्रीय पशुरोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत लाळखुरकुत रोग प्रतिबंधात्मक लसीकरणाद्वारे सन २०३० पर्यंत निर्मलन करण्याचे लक्षांकित आहे. जिल्ह्यात दिनांक १४.८.२०२५ ते ३१.१०.२०२५ या कालावधीत लाळखुरकुत लसीकरण फेरी ७ पार पडली असून ५९५००५ एवढ्या पशुधनाचे लसीकरण करण्यात आले आहे.

खात्याच्या मार्गदर्शक सूचना नुसार या पशुधनास दर सहा महिन्यांनी लाळखरकृत रोग प्रतिबंधात्मक लसीकरण करणे आवश्यक आहे. त्या अनुशान्गाने जिल्ह्यात लाळखुरकुत रोग प्रतिबंधात्मक लसीकरण फेरी ८ ही राज्यात व जिल्ह्यात दि.१३.०२.२०२६ ते २९.०३.२०२६ या कालावधीत राबविण्यास प्रारंभ झाला असून बीड जिल्ह्याकरिता एकूण ५०५३०० एवढ्या लस मात्रा प्राप्त असून तालुका स्तरावरून सर्व संस्थाना त्याचा पुरवठा करण्यात आला आहे. सदर लसीकरण मोहिमे मध्ये सर्व पात्र निरोगी पशुधनास लसीकरण करण्यात येणार असून सदर लसीकरणची नोंद भारत पशुधन प्रणालीवर घेण्यात येणार आहे. जनावरांच्या कानात बिल्ला असल्याची व संबंधित पशूपालकाच्या मोबाईल क्रमांक वर जढझ द्वारे पडताळणी करून छउ्ढच् वर ीशरश्र िंळाश ्पिळीीळपस करण्यात येणार आहे. तरी बीड जिल्ह्यातील सर्व पशुपालकांना अहवान करण्यात येते कि लाळखुरकृत या जीवघेण्या व आर्थिक नुकसान पोहोचवणाच्या या आजारापासून आपले बहुमूल्य पशुधनाचा बचाव करणे करिता नजिकच्या पशुवैद्यकीय चिकित्सालयास संपर्क करून लसिकरण करून घ्यावे व पशुवैद्यकीय चिकीत्सालायास सहकार्य करावे असे जिल्हा प्रशासनामार्फत आव्हान करण्यात येत आहे.

### डॉ. निधी पांडे सहसचिव भारत सरकार व जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले यांची

# पीएम श्री योजने अंतर्गत जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी शाळेला भेट

**नवीन नांदेड:– लातूर विभागात पिएम श्री योजने अंतर्गत प्रथम आलेल्या विष्णुपुरी जिल्हा परिषद शाळेस भारत सरकारचे सहसचिव डॉ.निधी पांडे व नांदेड जिल्हाधिकारी डॉ.राहुल कर्डिले यांनी २४ फेब्रुवारी रोजी भेट देऊन पाहणी करून विध्यार्थी पालकांशी ,सुसंवाद साधला,व भौतिक सुविधा शैक्षणिक गुणवत्ता बाबींचे निरीक्षण केले.**

पीएम पीएमश्री योजना ही एक राष्ट्रीय शैक्षणिक धोरण छएझ–२०२० च्या अंतर्गत सरकारी शाळांच्या दर्जा उंचवणारी केंद्र पुरस्कृत योजना आहे. या योजनेअंतर्गत देशभरात १५,५०० हून अधिक सरकारी शाळांना पीएम श्री शाळेच्या दर्जा प्राप्त झालेला आहे. या शाळा मॉडल शाळा म्हणून विकसित केल्या जात असून, डिजिटल शिक्षण,आधुनिक पायाभूत सुविधा, आणि सर्वांगीण विकासावर भर देऊन गुणवत्तेचे नेतृत्व करतात. महाराष्ट्रात ही या योजनेअंतर्गत अनेक शाळांची निवड करण्यात आली असून, त्यांच्या कायापालट केला जात आहे.त्यातील नांदेड जिल्ह्यातील एक नामांकित शाळा म्हणून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा योजने अंतर्गत लातूर विभागात प्रथम आलेली शाळा म्हणजे पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी होय,ही शाळा पीएम श्री योजने अंतर्गत असल्या कारणाने तसेच लातूर विभागात प्रथम आलेली शाळा असल्या मुळे भारत सरकारच्या सह सचिव डॉ.निधी पांडे यांच्या मार्गदर्शनात नांदेड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी डॉ .राहुल कर्डिले मुक्कावार ,उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड, शिक्षण अधिकारी सौ.वंदना फुटाणे सलगर ,बनसोडे,शिक्षण विभागातील अन्य अधिकाऱ्यांनी पीएम श्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी या शाळेला २४ फेब्रुवारी रोजी भेट देऊन शाळेतील विद्यार्थी आणि पालकांशी संवाद साधला, भौतिक सुविधा शैक्षणिक गुणवत्ता इत्यादी बाबींचे निरीक्षण






करून पीएमश्री योजने पूर्वीची आणि पीएमश्री योजनेनंतर शाळेची स्थिती जाणून घेतली.या योजनेच्या माध्यमातून शाळेच्या प्रगतीचा अहवाल पीपीटी च्या माध्यमातून शाळेच्या मुख्याध्यापिका सौ.उज्वला जाधव आणि शिवाजी वेदपाठक यांनी सर्व मान्यवरांनी दाखवले. मान्यवरांनी विद्यार्थी,पालक,शालेय व्यवस्थापन समितीचे सन्माननीय सर्व सदस्य, यांच्याशी यांच्याशी शैक्षणिक चर्चा करून शाळेतील वर्ग,भौतिक सुविधा,शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत आहार, इत्यादी बाबींचे निरीक्षण करून शाळेतील सर्व शिक्षकांचे कौतुक करून मार्गदर्शन केले. याप्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विलास आबासाहेब देशमुख हंबर्डे, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, माणिकराव हंबर्डे, शिवाजीराव हंबर्डे, विश्वनाथराव हंबर्डे,विष्णुपुरी ग्रामपंचायतच्या सरपंच संध्याताई विलासराव हंबर्डे,उपसरपंच अर्चना विश्वनाथराव हंबर्डे,राजेश हंबर्डे, पोलीस पाटील प्रवीण हंबर्डे,अमृत हंबर्डे, व इतर गावातील प्रतिष्ठित नागरिक पालक उपस्थित होते.

# मुखेडमध्ये वादळी वाऱ्या सह अवकाळी पावसाची जोरदार हजेरी

### गहू, ज्वारी, हरभरा व फळ बागायत पिकाच मोठ्या प्रमाणात नुकसान



मुखेड/प्रतिनिधी,

काल दुपारी चार ते पाचच्या दरम्यान मुखेड तालुक्यामध्ये जोरदार वादळ सुरू होऊन अवकाळी पावसाने कहरच माजवला. सुदैवाने यामध्ये जीवितहानी टळली मात्र पिकासहित झाडे, लाईटचे पोल पडून मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल आहे. अचानक पणे आलेल्या वाऱ्या वादळा मध्ये कुणाची घरावरची पत्र उडून गेली, तर कुणाच्या शेतीचे अतोनात नुकसान झाल्याची घटना दि. २३ फेब्रुवारी रोजी मुखेड तालुक्यात घडली.

दरम्यान सोमवारचा मुखेडचा आठवडी बाजार भरला होता. मात्र अवकाळी पावसामुळे ते विस्कळीत होऊन, बरंच काही नुकसान झाल्याची कबुली येथील शेतकरी व व्यापाऱ्याने प्रसार माध्यमाला दिली आहे.

तसेच विजेचा कडकडाटसह जोरदार वाऱ्यामुळे विद्युत तार व झाड तुटून, तहसील कार्यालयाच्या बाजूला उभी केलेल्या दुचाकीवर पडल्यामुळे, येथील परिसरात नुकसान झाल्याचे समजते. त्याचबरोबर बाजारातील खाऊक वस्तूचं सुद्धा मोठ्या प्रमाणात नुकसान झाल आहे शेतामधील पिकासोबतच चिंच, आंबा, पेरू, जांभळ, ज्वारी, गहू, हरभरा, व इतर पिकाचं काही प्रमाणात नुकसान झालं असून याची भरपाई शासन देईल का?

# बिलोलीत रेती माफियांचा हैदोस!

### पकडलेली गाडी आर्थिक व्यहारातुन रात्रीतून गायब – तहसील कार्यालयच संशयाच्या भोवऱ्यात

बिलोली /प्रतिनिधी

बिलोली तालुक्यात अवैध रेती वाहतुकीने अक्षरशः धुमाकूळ घातला असून महसूल प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नायब तहसीलदारांनी कारवाई करत अवैध रेती वाहतूक करणारे वाहन जप्त करून तहसील कार्यालय परिसरात उभे केले होते. मात्र, धक्कादायक बाब म्हणजे हीच गाडी रात्री उशिरा आर्थिक व्यवहार करून सोडण्यात आल्याची चर्चा समोर येत आहे.

या प्रकारामुळे तालुक्यात प्रचंड खळबळ उडाली असून कारवाई होती का फक्त दिखावा होती का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून विचारला जात आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, संबंधित वाहनाविरुद्ध कोणतीही स्पष्ट दंडात्मक कारवाई न करता ते गुपचूप सोडण्यात का आले हेच प्रश्न चिन्ह निर्माण होत आहे. त्यामुळे महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांवर संशयाची शब्द फिरत आहे.



ड बिलोलीत नागरिकांचे थेट प्रश्न:

+जप्त केलेले वाहन कोणाच्या आदेशाने सोडण्यात आले?

+शासन महसूलात किती दंड जमा झाला?

+तहसील कार्यालयातून वाहन रात्री कसे बाहेर गेले?

या प्रकरणात कोणाचा दबाव होता का?

दरम्यान, या घटनेचे छायाचित्र पुरावे उपलब्ध असल्याची माहिती मिळत असून प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे. जर तात्काळ चौकशी झाली नाही, तर हा प्रकार महसूल विभागातील संगनमताचा भाग असल्याचा संशय बळावण्याची शक्यता नाकारता येत नाही.

बिलोली तालुक्यात रेती माफियांचे जाळे किती खोलवर रुजले आहे?

आणि प्रशासन नेमके कोणाच्या दबावाखाली काम करत आहे?

या प्रश्नांची उत्तरे आता जनतेला हवी आहेत.

# २८ वे जिल्हा ग्रंथालय अधिवेशन १ मार्चला नायगावात

### भव्य ग्रंथ दिंडीने शहरात वाचन संस्कृतीचा जागर; युवकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे – खा. रवींद्र चव्हाण

नायगाव तालुक्यातील कै. अमृतराव पाटील व इंदिरा सार्वजनिक वाचनालय, नायगाव तसेच तालुक्यातील सार्वजनिक वाचनालयांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड जिल्हा ग्रंथालय संघाचे २८ वे वार्षिक अधिवेशन रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी जनता हायस्कूल, नायगाव बाजार येथे उत्साहात आयोजित करण्यात आले असल्याची माहिती खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण यांनी पत्रकार परिषदेत दिली.पत्रकार परिषदेत बोलताना खा. चव्हाण यांनी युवकांनी वाचनाची सवय लावून ज्ञानसमृद्ध समाज निर्मितीत सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

ग्रंथ दिंडीने होणार प्रारंभ अधिवेशनाची सुरुवात सकाळी ८.३० वाजता हनुमान मंदिर येथून भव्य ग्रंथ दिंडीने होणार आहे. ही दिंडी हनुमान मंदिर – स्व. वसंतराव चव्हाण जनसंपर्क कार्यालय – छत्रपती शिवाजी महाराज चौक – हेडगेवार चौक मार्गे जनता हायस्कूल येथे पोहोचणार आहे. भजनी मंडळे, वासुदेव, पारंपरिक वेशभूषेतील सहभागी आणि ग्रंथदिंडी धारक मान्यवर यांच्या उपस्थितीत वाचन संस्कृतीचा संदेश देणारी ही शोभायात्रा पार पडणार आहे.उद्घाटन समारंभ व जीवनगौरव सन्मान

ग्रंथ दिंडीनंतर उद्घाटन समारंभ होणार असून अध्यक्षस्थानी कमल किशोरजी कदम साहेब तर उद्घाटक म्हणून खा. रवींद्र वसंतराव चव्हाण उपस्थित राहणार आहेत. यावेळी ग्रंथ महर्षी गंगाधर पटणे जीवन गौरव सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

समाज माध्यमे आणि वाचन संस्कृतीवर मार्गदर्शन

आजची समाज माध्यमे, वाचन संस्कृती आणि आत्मनिर्वाहिता या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला असून अध्यक्षस्थानी डॉ. गोविंदराव हंबर्डे राहतील. प्रमुख वक्ते म्हणून जिल्हा ग्रंथालय अधिकारी अनिल सूर्यवंशी, राज्य ग्रंथनिरीक्षक प्रतापराव सुरेश आणि रंजीत धर्मापुरीकर मार्गदर्शन करणार आहेत.

पत्रकार परिषदेस मान्यवरांची उपस्थिती या अधिवेशनाबाबत माहिती देण्यासाठी आयोजित पत्रकार परिषदेला जिल्हा ग्रंथालय संघाचे जिल्हा उपाध्यक्ष राजेंद्र हंबीरे,सुधाकर पाटील जाधव,गोविंदराव वडगावकर,रामराव कोरे,कोषाध्यक्ष राणा मेटकर,सदस्य राजेश मोरे टाकळीकर,रमेश पाटील कांडाळकर, बळीराम जाधव सुजले गावकर,गजानन पवार होटाळकर,बालाजी शिंदे,तसेच पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

# कंधारमध्ये वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस

### गहू,ज्वारी, हरभरा व फळ बागायतीचे मोठे नुकसान

कंधार(प्रतिनिधी)

परवा २३ फेब्रुवारी रोजी दुपारी चार ते पाचच्या दरम्यान कंधार तालुक्यामध्ये जोरदार अवकाळी पाऊस वाऱ्यामुळे अनेक भागात शेतशिवारातील पिके आडवी झाली, तर शेतातील काढणीला आलेला हरभरा, ज्वारीसह कडबाही भिजला. शेतकऱ्यांनी कडबा तसेच काढणी केलेले पीक झाकण्यासाठी तारांबळ उडाली होती. काही भागात वाऱ्याचा कैऱ्यांनाही तडाखा बसला आहे.

वादळी वाऱ्यामुळे कौठा परिसरातील तीन पोल पडले होते सुदैवाने यामध्ये जीवितहानी टळली. तालुक्यातील शिवारातील आंब्यालाही फटका बसला, अनेक झाडांखाली कैऱ्यांचाही सडा पडला होता. तब्बल पाच मिनिटे वेगवान वारे व पंधरा मिनिटे पडलेल्या पावसामुळे चिंच,पेरू,जांभळ,ज्वारी,गहूसह शेतशिवारातील काढून ठेवलेल्या पिकांच्या बनमी उडाल्या,भिजल्या. पिके आडवी झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले. याबाबत पंचनामे करून भरपाई द्यावी,अशी शेतकऱ्यांतून मागणी केली जात आहे.

दिवसभर उन्हाचा तडाखा बसत असताना सोमवारी तीनच्या नंतर वातावरणात बदल झाला. त्यात ढगही दाटून आले. काही भागात सायंकाळी चार पाचच्या दरम्यानपावसाने हजेरी लावली. त्यामुळे काही वेळ वातावरणात गारवा पसरला होता. कंधारसह तालुक्यातील जवळपास सर्वच परिसरातील गावांत सायंकाळी पाच वाजता पावसाचा शिडकावा झाला. कंधार शहराचा बाजार अचानकपणे वादळी वाऱ्यासह पावसाने हजेरी लावल्याने भाजीपाले व्यापारी,शेतकरी आणि ग्राहकांसह शहरवासीयांची चांगलीच तारांबळ उडाली. तर बोरी (बु) येथील शेतकरी ज्ञानेश्वर बोरकर यांच्या गहू आणि केशर आंब्याचे मोठे नुकसान झाले आहे.

अवकाळी पाऊस किंवा गारपीट झाल्यास, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाने त्वरित नुकसानग्रस्त भागाची पाहणी,पंचनामा (कृषी,महसूल,ग्रामपंचायत संयुक्त), पीक विमा कंपनीला ४८ तासांत सूचना, आणि बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई व मार्गदर्शनासाठी तातडीची भूमिका बजावणे आवश्यक आहे, पण तालुका कृषी अधिकारी कार्यालय कंधार हे केवळ आणि केवळ नावालाच असल्याचे, त्या त्या गावातील शेतकऱ्यांत बोलल्या जात असल्याचे



समजते.तर कृषी अधिकाऱ्यांना फोन लावला असता ते फोन उचलतच नसल्याच्या तक्रारी शेतकऱ्यांत चर्चिल्या जात असल्याची माहिती समोर येत आहे.पंचनामे न करणाऱ्यांवर कारवाही होईल का?असा सवाल ही शेतकऱ्यांत उपस्थित केला जात आहे.

## किनवट येथे शिवजयंतीनिमित्त नितीन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान; मनोज जरांगे पाटील यांची विशेष उपस्थिती

ह. गोंडराजे शंकरशहा–रघुनाथशाह व्यासपीठावर भव्य कार्यक्रम; शिवप्रेमींसाठी विचारांची मेजवानी

किनवट /प्रतिनिधी : सार्वजनिक शिव जयंती उत्सव समिती, किनवट यांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त उद्या दि.२५ रोजी सायंकाळी किनवट येथे ह. गोंडराजे शंकरशहा–रघुनाथशाह व्यासपीठावर भव्य व्याख्यान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्राचे प्रख्यात व्याख्याते नितीन बानगुडे पाटील हे या कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत.

शिवचरित्र, स्वराज्याची संकल्पना, राष्ट्रनायकांचे विचार आणि सामाजिक एकात्मतेचा संदेश या विषयांवर नितीन बानगुडे पाटील आपल्या ओजस्वी शैलीत मार्गदर्शन करणार असल्याने शिवप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. त्यांच्या प्रभावी वक्तृत्वामुळे युवकांमध्ये इतिहासाविषयी अभिमान व प्रेरणा जागृत होते, अशी भावना आयोजकांनी व्यक्त केली आहे.

या कार्यक्रमास मराठा संघर्ष योद्धा म्हणून ओळखले जाणारे मनोज जरांगे पाटील यांची विशेष उपस्थिती राहणार असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला अधिक महत्त्व प्राप्त होणार असून विविध सामाजिक प्रश्नांवरही भाष्य होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर शहरात उत्साहाचे वातावरण असून व्यासपीठाची सजावट, ध्वनी व्यवस्था, प्रकाशयोजना तसेच सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. शिवजयंती उत्सव समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सार्वजनिक शिव जयंती



उत्सव समितीच्या वतीने किनवट तालुक्यातील शिवभक्त, नागरिक, युवक व महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## विद्यापीठात 'बालरंगभूमी व शिक्षणातील नाट्य' विषयावर व्याख्यानाचे आयोजन


नांदेड जिल्हा प्रतिनिधी

प्रभावी शिक्षणाकरीता नाट्यकलेची उपयोगिता, व्यक्तिमत्व विकासाच्या अनुषंगाने शिक्षणात नाट्यकलेचे वाढत जाणारे महत्व व निर्माण होणाऱ्या विविध व्यवसायाच्या संधीचा विचार करता स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील ललित व प्रयोगजीनी कला संकुलाच्या नाट्य व चित्रपट विभागातर्फे दि.२५ फेब्रुवारी, २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता क्वेस्ट, सोनाळे (टींरश्रळीं एर्वीलरींळेप ड्ढीीीीं ढ्ढीीीीं) या संस्थेचे श्री निनाद उचले यांचे 'बालरंगभूमी व शिक्षणातील नाट्य' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. क्वेस्ट हि संस्था मागील काही काळापासून ग्रामिण व अदिवासी शाळांतील मुलांमध्ये गुणवत्तापुर्ण शिक्षण व वाचन–लेखन, आणि सर्जनशील शिक्षण कार्यक्रम विकसित करण्यावर काम करते, या संस्थेचा मुख्य उद्देश आहे भाषिक साक्षरता व मुलांच्या शिक्षणाची गुणवत्ता वाढवणे. सदरील संस्था ही नाट्यकला व शिक्षण प्रक्रियेची सांगड घालण्याच्या अनुषंगानेही अनेक नाविन्यपुर्ण उपक्रम राबविण्यासाठी ओळखली जाते, तसेच या संस्थेमार्फत दर वर्षी काही निवडक तरुण नाट्य कलावंताना 'गोष्टरंग फेलोशीप' प्रदान केली जाते. सदरील व्याख्यानादरम्यान गोष्टरंग फेलोशीपची निवड प्रक्रिया, कार्यपध्दती, सृजनशील कामांच्या संधी व लाभ आदींविषयी सविस्तर माहीती दिली जाणार आहे

शहरातील तरुण, युवा नाट्य कलावंत, नाट्यसंस्था व शाळा–महाविद्यालयांमध्ये सृजनशील अध्यापनाचे काम करु इच्छीणाऱ्यांनी सदरील व्याख्यानाचा लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी संयोजक, नाट्य व चित्रपट विभाग प्रा. राहुल गायकवाड यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन ललित व प्रयोगजीवी कला संकुलाचे संचालक डॉ पृथ्वीराज तौर यांनी केले आहे.

## जेईई मेन्स परिक्षेत सर्वेश लोणे चमकला

अर्धापूर (प्रतिनिधी) नुकत्याच जाहिर झालेल्या जेईई मेन्स २०२६ (सेशन १) परिक्षेच्या निकालात लहान येथील सर्वेश महेंद्र लोणे ९७.९२ परसेंटाइल मिळवून नेत्रदीपक यश संपादन केले.



या यशाबद्दल जैन ईंटरनेशनल स्कुलचे प्राध्यापकांनी सर्वेश लोणे यांच्या व आई–वडील सत्कार केला. गाव लहान पण किर्ती महान सर्वेशच्या या यशाने लहान गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तसेच इयत्ता दहावीच्या आयसीएससी बोर्डात ९४% मिळवून सीडीएस स्कूल, येथून घवघवीत यश संपादन केलेले आहे. कालकथित ज्येष्ठ साहित्यिक कविवर्य प्रा. दु. मो. लोणे यांचा नातू असून, त्याचे वडील मदर डेअरी येथे गुणनियंत्रण विभाग प्रमुख आहेत. सातत्यपूर्ण अभ्यास घरच्या सर्वांच्या मार्गदर्शनामुळे, जेईई मेन्स च्या परिक्षेत यश संपादन केले आहे, त्याच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.